# ज्ञान प्रबोधिनी : स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण)

## वार्षिक वृत्त

**राष्ट्रीय सौर शके १९४३-४४ (सन २०२१-२२)**

## एका दृष्टिक्षेपात ...

**आर्थिक साक्षरता**
- बचत गट : १८० बचत गट
  ६५ गावे, दरमहा ६.८० लाख दरमहा बचत
- खेळते भांडवल
  १४ गावे २८ जणी ४,८५,०००/-
- स्वयंरोजगार
  - शाश्वत: शेती आधारित स्वयंरोजगार (३ गावे)
  - संपदा : शेती व कौशल्य आधारित स्वयंरोजगार (९ गावे)
  - राम सीता पुराणिक तंत्र निकेतन : प्रशिक्षण व उत्पादन केंद्र शिवापूर
  - स्वाधार : पासली खोऱ्यात स्वयंरोजगार (५ गावे)
  - ज्वाला : इंधन कांडी उत्पादन व चूल वाटप
  - धनश्री : शिवण, पार्लर व हस्त कौशल्य, नसरापूर केंद्र

**आरोग्य**
- आरोग्य सखी (वेल्हे) ८० गावे १२,००० लोक सहभाग
- टेलीमेडिसीन १२ आशा, करंजावणे प्राथमिक आरोग्य केंद्राची २०,००० लोकसंख्या
- हाडांची तपासणी ४ गावे ९६ जणींची तपासणी
- कर्करोग सर्वेक्षण १०,००० जणांचे सर्वेक्षण
- आरोग्यसखी (शिवापूर) ३५० जणींची जाणीव जागृती

**नेतृत्व विकास**
- नवदिशा नेतृत्व प्रकल्प २५ गावातील २५ जणींचे प्रशिक्षण
- नवरात्र मेळावे ४८ गावात १४३४ जणी सहभागी

**व्यक्ती विकास**
- युवती विकास १ कॉलेज व संघटन गट
- दल ६० गावे १३४० मुले-मुली
- हिरकणी १३ गावे १४४ जणी

**वंचित गटांसाठी काम**
- जास्वंद गिरीकन्या सहनिवास : १४ गावे ३३ मुली
- कातकरी विकास प्रकल्प नियमित संपर्क २ वस्त्या ५० कुटुंबे
- एकल महिला ३५ गावे ६० जणी

### ♦ ज्ञान प्रबोधिनी संस्थेचे पदाधिकारी ♦

| | | | |
|---|---|---|---|
| **अध्यक्ष** | **उपाध्यक्ष** | **कार्याध्यक्ष** | **संचालक** |
| डॉ. रघुनाथ माशेलकर | डॉ. विजय केळकर | श. बा. तथा रवि पंडित | डॉ. गिरीश श्री. बापट |
| | कि. बा. (अण्णा) हजारे | **कार्यवाह** | **विभाग प्रमुख** |
| | | वि. शं./सुभाष देशपांडे | सौ. सुवर्णा गोखले |

# मनोगत

स्त्री शक्ती प्रबोधन विभागाच्या ग्रामीण कामाचे हे २७ वे वर्ष! हे वर्ष गेल्या वर्षीप्रमाणेच करोनाच्या छायेत गेले. वर्ष संपताना थोडी थोडी मोकळीक मिळाली, त्या वेळात भरीव काम करायला मिळाले. या करोना महामारीने सगळ्यांनाच खूप शिकवले. करोना काळाने आपल्याच लोकांकडून काय अपेक्षा करायच्या, येथपासून ते काय अपेक्षा करायच्या नाहीत पर्यंत सगळं शिकवले. 'अगदी वेळेला माणूसबळ हवं' पासून 'चार पैसे बाजूला ठेवलेले असले तर वेळेला उपयोगी पडतात' हे सगळं सगळं समजले, त्यामुळे वर्षाच्या अखेरीला आपण अर्थसखी प्रकल्प केला. त्यातल्या सत्रामध्ये विम्याची माहिती घेताना महिलांनी खूप प्रश्न विचारले! कार्यकर्त्या गटाने करोना ही सुद्धा संधी, असेही अनुभव घेतले.

आता काम करणारा, कर्ता गट अधिक जबाबदारी घेउन काम करायला लागला आहे. करोनामध्ये गावाने स्थानिक कार्यकर्त्यांवर ठेवलेला विश्वास पुढच्या कामासाठी ऊर्जा देऊन गेला. वर्षाच्या मध्यावधीत पुढच्या १० वर्षाचे नियोजन करण्यासाठी बैठक घेतली. बैठकीला भरभरून प्रतिसाद मिळाला. करोना काळाच्या अनुभवाने गट किती प्रगल्भ झाला आहे हे त्यांची मोठ्ठी झालेली स्वप्न बघून कळत होते. आधीचा १० वर्षाचा भवितव्य लेख लिहिला तेव्हा या सगळ्यांना डोळ्यासमोर ठेऊन लिहिला होता.... एकदा का दृष्टीकोन बदलला की मग करोना ही सुद्धा संधी असू शकते असा अनुभव सगळ्यांनी मिळून घेतला. येत्या दहा वर्षांचा भवितव्य लेख लिहिताना त्या त्यांची स्वप्नं सांगत होत्या, ती ऐकताना त्यांनी त्यांच्या मनाच्या मर्यादा कशा पार केल्या आहेत असं कळत होतं. कोणी 'राहीलेले शिक्षण पूर्ण करणार' असे सांगत होती तर कोणी 'निवडणूक लढवणार' असे सांगत होती; त्यामुळे नेतृत्वाच्या कामाची यादीच तयार होत होती, कोणाला 'प्रशिक्षक व्हायचे' होते तर कोणाला 'स्वतःच्या पैशानं विमान प्रवास' करायचा होता... त्यासाठी स्वयंरोजगाराचे नियोजन होत होते; असे मनातले नि जनातले एकत्र गुंफले जात होते. गटाने काय काय करायचे असे ठरवायची यादी मोठ्ठी होत होती... कारण काही गोष्टी एकटीने करता येतच नाहीत याची मनोमन खात्री पटलीच होती.

या वर्षीच्या अवघड परिस्थितीत सुद्धा एकत्र काम करताना जिवाभावाच्या मैत्रीचे बंध अधिकाधिक घट्ट झाले आहेत असे स्पष्ट होत होते! त्यामुळे करोनाला न घाबरता हा गट अनेक नवीन गोष्टी ऑन लाईन सुद्धा करायला शिकला. तंत्रज्ञानाच्या मर्यादाही ओलांडल्या, त्यांचा हा प्रवास आपण वाचूया!!

**राजस्थान दौरा : अनुभव**

राजस्थानचा बेअरफूट कॉलेज पाहताना मनात आले की, तेथील महिला एवढे कमी शिक्षण घेऊन, अशिक्षित असून सुशिक्षित महिलांना शिकवतात, तेव्हा स्वतःचीच लाज वाटली की आपण काय करतोय? समोरच्यांचे मत विचारात घेणे, त्यांच्यातील चांगले गुण ओळखणे, पुढाकार घेणे, आत्मविश्वास वाढवणे, शिक्षणाची आवड निर्माण करणे, स्वावलंबी राहून मुलांना शिक्षण देणे, त्या महिलांची निःस्वार्थ सेवा, हे मला खूप आवडले.

**केंद्रभेट : सेतुबंधन**

या वर्षी निगडी केंद्रातील पालक गटाची कामाला भेट झाली. ही भेट म्हणजे दोन्ही केंद्रातील सदस्यांना प्रबोधिनीचे काम कुठे चालते यांचा चलता बोलता परिचयच होता. त्यामुळे आपण कुठल्या संघटनेचे घटक आहोत हे दोन्ही गटांना अधिक स्पष्ट झाले .... केंद्रा बद्दलचा आपलेपणा वाढला!

या वर्षी आपण आपल्या कामाच्या काही छोट्या चित्रफिती केल्या. त्या आपल्या यू ट्यूब चॅनल वर आपल्याला बघायला मिळतील जरूर बघा.

# ❖ करोना काळातील काम ❖

◈ **या वर्षीच्या कामावर करोना छाया होती. वर्षाच्या सुरुवातीचा काही काळ तर फक्त करोना संबंधित उपक्रम चालू होते. त्यात आरोग्याचे, समुपदेशनाचे आणि धान्य वाटप करणे असे जे काम केले, त्याचा तपशील खाली देत आहे.**

### ♦ करोनासमुपदेशन प्रकल्प ♦

४ मे ते २५ जून या कालावधीत समुपदेशन प्रकल्प केला. ग्रामीण महिलांनी, ग्रामीण भागातच करोना संबंधित समुपदेशन केले. स्थानिक महिलांना प्रशिक्षण देऊन समुपदेशक म्हणून बोलायला शिकवले. या उपक्रमाचा हेतू करोना बाधित व्यक्ती व त्याच्या कुटुंबा मधील सदस्यांच्या सोबत फोनवर अथवा प्रत्यक्ष बोलून त्यांना मानसिक आधार देणे असा होता. नियमित कामात असणाऱ्या ४० जणींनी प्रशिक्षण घेतले व त्यातल्या २४ जणींनी ६४ गावातील ५०५ जणांसोबत बोलणे (सखी संवाद) केले. या मध्ये स्त्री पुरुष दोघेही होते हे विशेष! यामुळे गावातील लोकांची मानसिकता, आर्थिक परिस्थिती लक्षात आली. तसेच त्यांच्या मनात असलेली करोनाची भीती कमी झाली. या समुपदेशाने अनेक वयस्कर मंडळी लस घ्यायला तयार झाली. कुठे तर बरे होऊन घरी आलेल्या रुग्णांना वाळीत टाकले जात होते त्यावर आजूबाजूच्या लोकांशी सुद्धा बोलले गेले. समुपदेशक गटाच्या नियमित आढावा बैठकींमुळे करोनाचे गांभीर्य कुठल्या भागात किती आहे हे समजत होते. त्यामुळे नेमक्या माहितीची देवाण घेवाणही चांगल्या प्रकारे झाली. या समुपदेशनामध्ये वय वर्षे ६ पासून ६० वर्ष ओलांडलेल्यांशी संवाद साधला गेला. त्यातून गावात विधायक बदल झालेले दिसले. यामुळे कर्त्या गटाला या संवादामुळे आपण लोकांना धीर देऊ शकतो असा एक वेगळाच विश्वास आला!

### ♦ प्राथमिक आरोग्य केंद्रास ऑक्सिजन ♦ concentrator भेट

प्राथमिक आरोग्य केंद्रात करोना बाधितांची संख्या वाढत असताना ऑक्सिजन concentrator गरज भासत होती. तेव्हा रोटरी क्लब ऑफ पूना मिड टाऊन यांच्या अर्थसाहाय्यामुळे वेल्हे प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी ऑक्सिजन concentrator देण्यात आले. एका छोट्या कार्यक्रमात रोटरीचे श्री. गुळवणी, ज्ञान प्रबोधिनीचे मितेशदादा आणि रंजितताई सरवदे यांच्या उपस्थितीत आरोग्य केंद्राला हे यंत्र देण्यात आले.

### ♦ करोना काळातील शिधा वाटप ♦

करोना काळात ३८ गावांमधील २३५ कुटुंबांना आपण शिधा दिला. यात एकल महिलांच्या घरी जाऊन सद्धा शिधा दिला. करोना काळात दुर्गम गावांपर्यंत रोज लागणाऱ्या किराणा माला सारख्या अनिवार्य वस्तू आपल्या कार्यकर्त्यांनी घरोघर पोहोचवल्या. त्यापैकी पासली खोऱ्यातील ९ गावांमधील ६७ कुटुंबांसाठी शिधा वाटप केले.

### ♦ आरोग्य सखी प्रकल्प ♦

या वर्षी आरोग्य सखी हा आरोग्य जाणीव जागृतीचा प्रकल्प असल्यामुळे करोनाच्या निमित्ताने अधिक विस्तारला आधीच्या वर्षी प्रकल्पात असणाऱ्या ५० गावात ३० गावांची भर पडून भोर-वेल्हे तालुक्यातील ८० गावांमध्ये हा प्रकल्प राबवविला. Bajaj Holdings and Investments Limited या कंपनीच्या आर्थिक मदतीने हा प्रकल्प करण्यात आला. ६५ स्थानिक कार्यकर्त्यांनी **आरोग्य सखी** म्हणून या प्रकल्पात काम केले.

वेगवेगळ्या ८ विषयांवरील जाणीव जागृतीची सत्रे या आरोग्य सखींनी घेतली. गावागावात ५ प्रकारच्या आरोग्य तपासण्यांचे आयोजन केले. गावातील ज्या महिलांवर पुढे वैद्यकीय उपचार करण्याची गरज आहे त्या महिला डॉक्टरांपर्यंत पोहोचतील, त्यांना आवश्यक ते उपचार मिळतील यासाठी पाठपुरावा केला, आवश्यक तेथे आर्थिक मदतही मिळवून दिली. स्थानिक कार्यकर्त्यांनी अतिशय मनापासून आरोग्याचे हे काम केले, त्यामुळे गावातील महिलेला आपले आरोग्याचे प्रश्न जिच्याशी मोकळेपणाने बोलता येतील अशी एक **आरोग्य सखी** त्यांच्या गावातच मिळाली. करोना काळामुळे स्थानिक व्यक्तीचे महत्त्व सगळ्यांच्या लक्षात आले.

जाणीव जागृती सत्रे

| | विषय | एकूण सत्रे | सहभागी महिला |
|---|---|---|---|
| १. | मासिक पाळी संदर्भात सत्र | १७ | ९२ |
| २. | स्त्री आरोग्य (गर्भाशयाचा व स्तनांचा कॅन्सर) | | १०० |
| ३. | जंत संसर्ग | २० | २१३ |
| ४. | सकस आहार | १६ | ८४ |
| ५. | तंबाखू मुक्ती | ३ | २२ |
| ६. | मानसिक आरोग्य | ४ | ७३ |
| ७. | आरोग्य विमा | २ | २१ |
| ८. | ओळख स्पर्शाची(लहान मुलं) | ४९ | ३६६ |

एकूण ८ प्रकारचे विषय १२१ सत्रांद्वारे ९७१ व्यक्तींपर्यंत पोहोचवले

☞ **मानसिक समुपदेशन :** रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी यांच्याकडून दि. ८ ते १३ मार्च असा ६ दिवसांचा समुपदेशन परिचय अभ्यासक्रम आभासी पध्दतीने आयोजित केला होता. या कोर्समध्ये ११ जणी सहभागी झाल्या होत्या. त्यांना प्रमाणपत्रं मिळाली.

**♦ आरोग्य तपासण्या ♦**

| क्र. | तपशील | तपासणी | संख्या (रुग्ण) | सहभागी सदस्य |
|---|---|---|---|---|
| १ | डोळे | १६ | ३४३ | स्त्री पुरुष |
| २ | गर्भाशय कर्करोग | ९ | ७२ | महिला |
| ३ | गरोदर माता तपासणी | ७ | ९३ | गरोदर महिला |
| ४ | दात तपासणी | १८ | १३९ | |
| ५ | हिमोग्लोबिन तपासण्या | ४७ | २५३ | स्त्री पुरुष |
| ६ | बाल आरोग्य तपासणी | ७ | २५४ | लहान मुले |
| ७ | लहान मुलांचे लसीकरण | | | |
| ८ | कावीळ लसीकरण | २ | २३२ | लहान मुले |

☞ **कॅन्सर विषयक जाणीव जागृती आणि टेस्ट :** डॉक्टर शुभांगीताई कानिटकर यांनी गावांमध्ये येऊन, सोप्या मराठीमध्ये महिलांना स्तनाच्या आणि गर्भाशयाच्या पिशवीच्या मुखाच्या कॅन्सर विषयी शास्त्रीय माहिती दिली. ७२ महिलांची टेस्ट केली. ज्यांना उपचारांची गरज आहे अशांवर दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये अगदी कमी खर्चात उपचार करण्यात आले.

☞ **दात तपासणी :** आपण आंबवणे केंद्रामध्ये दाताची तपासणी व उपचार करत आहोत. वृत्त कालावधीत १३ गावातील १३९ जणांनी लाभ घेतला. डॉक्टर वैदेही, डॉक्टर अनुजा आणि डॉक्टर प्रचिती या सातत्याने येऊन आपली सेवा आंबावणे गावात देत आहेत.

☞ **गरोदर महिलांची तपासणी :** १५ वर्षांहून जास्त काळापासून डॉक्टर वैशालीताई बिनीवाले आणि त्यांच्याबरोबर काम करत असणारे डॉक्टर सहकारी, परिचारिका तसेच साहाय्यक आणि ऑफिसमध्ये साहाय्य करणाऱ्या त्यांच्या सहकाऱ्यांची एक टीम वेल्ह्यात येते आहे. या वर्षी ९३ महिलांनी या सुविधेचा लाभ घेतला आहे. पाटणकर नर्सिंग होमच्या पाटणकर विश्वस्त निधीतून गरोदर महिलांना मोफत औषधे दिली जातात. ज्यांचे बाळंतपण सुरक्षित नाही अशांसाठी विशेष काम केले जाते. ज्यांची परिस्थिती नाही अशा मातांसाठी अत्यंत अल्प शुल्कामध्ये प्रसूतीची सेवा देखील पाटणकर विश्वस्त निधीच्या साहायाने होत आहे.

☞ **बाल आरोग्य तपासणी :** ७ तपासणी शिबिरांमध्ये मिळून २५४ मुलांची तपासणी झाली. त्यातील काही मुले कुपोषित किंवा तीव्र कुपोषित आढळल्याने त्यांच्यावर विशेष उपचार होतील असे पाहिले. यासोबत आपण यंदा नवजात शिशु आरोग्य तपासणी सुरू केली, ज्यामध्ये १० दिवसांपासून १ वर्षे वयापर्यंतच्या बालकांची तपासणी केली. या निमित्ताने आपल्या गावपातळीवर काम करणाऱ्या हिरकणी ताईला प्राथमिक तपासणी करायला शिकवले.

☞ **प्रशिक्षण :** या वर्षी आरोग्य सखी प्रकल्पात वेल्हे तालुक्यातील सर्व अंगणवाडीताई यांच्यासाठी २ प्रशिक्षणे योजली तर १५ आशा कार्यकर्त्यांसाठी १ प्रशिक्षण योजले होते.

☞ **किशोरी विकास उपक्रम :** ऑक्टोबर महिन्यात शाळा सुरू झाल्या पण शाळेत मुली येत नव्हत्या. गावागावातून इ. ७ वीतून इ. ८ वीत प्रवेश घेतला आहे अशा सर्व किशोरींचा शोध घेतला. एकूण १६ गावातील ५४ किशोरींच्या घरी गृहभेटी दिल्या. किशोरी व पालकांना उपक्रमाची सविस्तर माहिती दिली. गावपातळीवर तीन चार गावातील किशोरींना एका गावात एकत्र करून तास घेण्यास सुरुवात झाली. गावपातळीवर मंदिर, शाळेचे मैदान, कोणाच्या तरी घरात असे दोन तास मुली जमत होत्या. शाळा सुरू नव्हत्या आणि मुलींकडे वेळ उपलब्ध होता त्यामुळे ज्या मुली जमत होत्या त्यांच्यासाठी जास्त वेळा भेटून वेगवेगळी कौशल्यं शिकवायची योजना केली. गावातच २० मुलींचे दोन ठिकाणी तीन तासांचे मेळावे घेतले.

या शिवाय ऑगस्ट २०२१ ते फेब्रुवारी २०२२ या कालावधीत वेल्हे तालुक्यातील ५ शाळांमध्ये पंधरा दिवसातून एकदा याप्रमाणे नियमित तासिका घेण्यात आल्या. त्यात बौद्धिक विकसनावर, मानसिक विकसना संबंधी, शारीरिक विकसन, हस्त कौशल्य या विषयी तासिका घेतल्या.

अवांतर वाचनासाठी 'सुंदर हस्ताक्षर', 'वेध यशाचा', 'जिद्दीची लोभस रुपे' अशा तीन पुस्तिका व कंपॉस पेटी किशोरींना भेट दिली.

✼ **तंबूतील निवासी नेतृत्व शिबिर :** दि. ८ व ९ जानेवारी २०२२ या दिवशी इ. ९ वी व इ. ११ वी तील ७० किशोरींचे **नेतृत्व** या विषयावरील तंबूतील निवासी शिबिर विहीर गावी झाले. मुलींनी आपल्या गटाचा तंबू आपणच उभा करायचा असा अनुभव घेतला. मा. बागेश्रीताई पोंक्षे यांनी नेतृत्व म्हणजे काय हे काही उदाहरणे देऊन सांगितले. एक फिल्म दाखवून नेतृत्व कशाला म्हणायचे याचे उत्तम असे मार्गदर्शन केले.

११ वी साठी शिबिराचा विषय विज्ञान होता. घरातील रसायन शास्त्रातले प्रयोग, जादूचे प्रयोग, भौतिक शास्त्रातील प्रयोग असे ६ प्रयोग या शिबिरात मुलींना करायला दिले. त्याविषयी प्रबोधिनीतील पूर्वाताई दीक्षित यांनी मार्गदर्शन केले. प्रयोगातील विज्ञान हे प्रत्यक्ष कृतीतून अनुभवता येण्यासाठी सर्व प्रयोग केले. याशिवाय 'विज्ञान' असे म्हणत असताना आधी निरीक्षण, मग त्यावर प्रश्न पडणे, प्रश्न विचारणे, त्यावर उत्तर शोधणे अशा गोष्टी खूप महत्त्वाच्या असल्याने निरीक्षण

कौशल्य,प्रश्न कौशल्य, समस्या परिहार, वाद विवाद स्पर्धा अशा विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. याशिवाय नवीन मैत्रिणींची ओळख, गटात खेळणे, पद्य गायन, शेकोटी, धरणाच्या काठी शिबिर असल्याने निसर्गाचा आनंद घेणे, कुडकुडत्या थंडीमध्ये तंबूमध्ये झोपणे अशा बऱ्याच गोष्टी पहिल्यांदा अनुभवून दोन दिवसांचे शिबिर संपताना घरी जाताना मुलींचे डोळे भरून आले होते. खूप अनुभवसंपन्न असे शिबिर झाले.

*** १० वीतील किशोरींसाठी अभ्यासकौशल्य मार्गदर्शन मेळावा** : इ.१० वीतील किशोरींसाठी अभ्यासाविषयी मार्गदर्शन करण्यात आले. त्यामध्ये सोंडे माथना, मंजाई आसनी, साखर व वेल्हे अशा चार शाळेतून ४६ किशोरी सहभागी झाल्या होत्या. या मेळाव्यात अभ्यास कसा करावा, कुठल्या प्रश्नांना किती गुण दिले जातात, अभ्यासाचे नियोजन या विषयी ज्योतीताई केमकर यांनी मार्गदर्शन केले. तसेच गणितातील वेगवेगळ्या ट्रिक्स वापरुन गणितं कशी सोडवायची या विषयी निवेदिताताई पावनस्कर यांनी मार्गदर्शन केले.

*** दले** : मुलांमध्ये लहानपणापासूनच व्यायामाची गोडी लागावी यासाठी १५ गावांमधून २२५ मुला–मुलींसाठी दले घेण्यात आली. ज्यामध्ये मैदानी खेळ, सूर्यनमस्कार यावर भर दिला होता.

☞ **समारोप** : आरोग्यविषयक या अशा आरोग्य सखी प्रकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे विविध जागृती सत्रे आणि तपासण्या, करोना जागृती, दले, किशोरी विकास अशा सगळ्या उपक्रमांमधून भोर–वेल्हे येथल्या १२,००० नागरिकांपर्यंत पोचलो. त्यांची आरोग्यविषयक जाणीव वाढवू शकलो.

☞ **बाह्य परिक्षण** : आपण केलेले काम तपासायला बजाज कंपनीने बाह्य परीक्षक नेमले होते. त्यांनी ३ दिवसांत वेल्ह्यातील विविध गावांमधून ३००च्या वर सदस्यांकडून प्रकल्पाची माहिती घेतली. प्रत्यक्ष २ गट येऊन ७ दिवस भागात होते. गाव कार्यकर्त्यांसोबत गटचर्चा झाल्या. नियोजनाप्रमाणे आपण काम केले असे त्यांनी नमूद केले.

☞ **फिल्म निर्मिती** : आरोग्य सखी या प्रकल्पावर एक उत्तम फिल्म तयार केली आहे. मा. गिरीश केमकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अत्यंत कुशलतेने या प्रकल्पाचा आशय सर्वांसमोर आणला आहे. मार्च २०२२ मध्ये सर्व आरोग्य सखींचा एकत्र मेळावा घेऊन या प्रकल्पाची सांगता झाली.

## ❖ आरोग्याचे अन्य प्रकल्प ❖

आरोग्य सखी या मुख्य प्रकल्पामुळे महिलांची आरोग्याचे काम करायची भीड चेपली आणि त्यामुळे इतरही प्रकल्प करायचे बळ मिळाले.

☞ **महिलांची हाडांचा ठिसूळपणा तपासणी :** ५ फेब्रुवारी रोजी वाजेघर येथे रोटरी क्लब ऑफ पुणे डेक्कन जिमखाना यांच्या सहकार्याने महिलांची तपासणी झाली. १० गावातील ९३ महिलांच्या हाडांचा ठिसूळपणा तपासला. यात गंभीर परिस्थिती असणाऱ्या २७, मध्यम परिस्थिती असणाऱ्या ४७ तर नॉर्मल परिस्थिती असणाऱ्या केवळ १९ जणी होत्या. रोटरी क्लबच्या डॉ. श्री. व सौ.निरंतर आणि त्यांचे सहकारी उपस्थित होते. त्यांनी तपासणी करून औषधे दिली

☞ **टेलीमेडिसिन :** रोटरी क्लब ऑफ पुणे प्राईडच्या आर्थिक मदतीने करंजावणे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या गावांमध्ये हा प्रकल्प चालू आहे. काही तांत्रिक अडचणींमुळे काही काळ तपासणीचे काम बंद होते. तरीही वर्षभरात३५ शिबिरांमधून ९१९ लोकांची तपासणी केली. हे घडण्यासाठी वर्षभरात आशा आरोग्य सेविकांच्या १२ बैठका घेतल्या तर प्राथमिक आरोग्यकेंद्र अधिकाऱ्यांसोबत ३ बैठका झाल्या.

☞ **आरोग्य सखी शिवापूर :** जानेवारी २०२२ पासून ३ महिने कालावधीसाठी हा प्रकल्प झाला. या प्रकल्पात शिवापूर जवळील ५ शाळांमधील मुलींना मासिक पाळी विषयी शास्त्रीय माहिती देऊन sanitary pad वापरण्याचे फायदे सांगणे असे काम केले. मार्च महिन्यात आर्वी, खेड व कल्याणच्या शाळेतील मुलींसाठी व महिलांसाठी अशा एकून ३५० जणींसाठी सत्रे झाली.

☞ **कॅन्सर सर्वेक्षण आणि अनुधावन प्रकल्प :** कार्कीनोज कंपनी सोबत जानेवारी २०२२ पासून कॅन्सर विषयक आरोग्याची माहिती असलेले फॉर्म्स भरणे अशा प्रकल्पाला सुरुवात झाली. ६००० व्यक्तींची माहिती फॉर्म मध्ये भरली असून त्या माहितीचे विश्लेषण होत आहे. त्यातील माहितीवरून ज्यांना कॅन्सर होण्याची शक्यता वाटते आहे अशा जोखीम असणाऱ्या पेशंटची तपासणी गावपातळीवर निःशुल्क होणार आहे. त्यानंतर कोणाला कॅन्सर असेल तर त्याला पुढील उपचारात घवघवीत सूट मिळणार आहे.

### कार्यक्षेत्र

- **स्त्री शक्ती प्रबोधनचे ग्रामीण भागातले काम वेल्हे, भोर, हवेली या पुणे जिल्ह्यातल्या ३ तालुक्यात चालते. या कामात ८२ गावाचा समावेश होतो. या गावांत १३,७९२ कुटुंब संख्या आहे ज्याची लोकसंख्या, जनगणना २०११ नुसार ६७,१२१ आहे.**
- **हे कार्यक्षेत्र पुण्यापासून १५ किमी. अंतरावर सुरू होऊन ८५ किमी.अंतरावर, रायगड जिल्ह्याच्या सीमेजवळ संपते. या भागात सिंहगड, राजगड, तोरणा हे किल्ले येतात!**

# ❖ आर्थिक उपक्रम ❖

**बचत गट :** जिजामाता प्रबोधन केंद्र ही स्थानिक संस्था गेली अनेक वर्षे ज्ञान प्रबोधिनी सोबत काम करते आहे. या केंद्रामार्फत बचत गटाच्या १३ विभागात मिळून १८० बचत गट वर्ष अखेरीला चालू होते. ३०२१ सभासद असणाऱ्या या गटांनी १.६० कोटी रु. बचत करून ३.६४ कोटी रु. कर्ज वापरले असे हिशोबात दिसते. आता अनेक वर्षांच्या अनुभवाने हे गट घेण्याचे काम स्थानिक कार्यकर्त्या उत्तम प्रकारे करतात. ही आर्थिक स्वयंपूर्णता स्त्री शक्ती प्रबोधनाची पहिली पायरी आहे.

| | गट | सभासद | बचत | कर्ज | व्याज | दंड |
|---|---|---|---|---|---|---|
| खोपी | 14 | 189 | 732650 | 3474400 | 177575 | 0 |
| नवदिशा | 13 | 217 | 323400 | 1661400 | 203216 | 0 |
| सांगावी | 19 | 281 | 1710600 | 4624500 | 914544 | 30 |
| शिवरे | 14 | 218 | 2497900 | 5146310 | 885671 | 420 |
| कासुर्डी | 12 | 194 | 354600 | 789500 | 78609 | 0 |
| आंबवणे व राजगड | 19 | 327 | 1096900 | 1419380 | 448064 | 100 |
| संपदा | 8 | 152 | 632000 | 1245826 | 333098 | 0 |
| शाश्वत | 13 | 243 | 982900 | 2166350 | 429376 | 0 |
| वेल्हे | 35 | 581 | 2485500 | 6612398 | 978319 | 19007 |
| शिवापुर-पुणे | 11 | 195 | 3370200 | 5100347 | 545180 | 3400 |
| पारवडी | 13 | 254 | 874400 | 1513126 | 245397 | 1500 |
| नव चेतना | 9 | 170 | 1023300 | 2719085 | 487502 | 2109 |
| | **180** | **3021** | **16084350** | **36472622** | **5726551** | **26566** |

# ❖ स्वयंरोजगार ❖

**◈ या वर्षी स्वयंरोजगार प्रशिक्षण व उत्पादन विक्रीचे अनेक प्रकल्प केले त्याचा तपशील खाली देत आहे.**

### ♦ शाश्वत प्रकल्प ♦

पुणे जिल्ह्याच्या वेल्हे तालुक्यातील अडवली, आस्कवडी, मार्गासनी या ३ गावांमध्ये १ जानेवारी २०२१ पासून ३१ मार्च २०२२ या कालावधीत शाश्वत प्रकल्प झाला. प्रकल्पाचा हेतू असा होता की शेतीवर आधारित व्यवसायाने शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे! यासाठी महिलांना प्रशिक्षणे देऊन उत्पादन करून घेणे असे ठरवले होते. हे करण्यासाठी गाववार कृषी सखींची नेमणूक करून बचत गट स्थापन केले, सभासदांना प्रशिक्षणे दिली आणि बचत गटातून कर्ज वाटप करून शेतीव्यवसायाला अर्थसाहाय्य देउन चालना दिली.

☞ **प्रशिक्षणे :** ३ गावात १६ प्रकारचे प्रशिक्षण वर्ग घेतले. या वर्गात १२१ महिला सहभागी झाल्या. उकडीचे मोदक, शंकरपाळी, बेसन लाडू,सोयाबीन दूध व दुधाचे पदार्थ अशा खाद्यपदार्थां बरोबरच लाकडी कोळसा इंधन बनवणे, मक्याच्या कणसाचे दाणे काढणे, गांडूळखत बनवणे या विषयांवरही प्रशिक्षणे झाली.

☞ **बचत गटातून कर्ज वाटप :** ४८ शेतकरी महिलांना १४,७०,०००/– रुपये शेती आणि शेतीपूरक व्यवसायांसाठी बचत गटातून कर्जे दिली. यातून शेतीसाठी, गाय/ म्हैस खरेदीसाठी, खते, बियाणे यासाठी कर्ज दिले.

शाश्वत प्रकल्प अंतर्गत एकूण १३ बचत गटांचा शाश्वत विभाग केला. सर्व बचत गटांची बँकेत खाती काढली. विभागाची नियमित बैठक झाली. करोना असल्यामुळे उत्पादन विक्रीला बऱ्याच मर्यादा येणार असल्याचे लक्षात आले. विभागात उत्पादन वाढ कशी करावी यावर चर्चा झाल्यामुळे **शेतीसहल** व फराळ उत्पादन असे गटांनी मिळून करावे असे ठरले. या अभिनव उपक्रमाला शहरातील लोकांकडून उदंड प्रतिसाद मिळाला आणि ४९ कुटुंबांनी या शेतीसहलीचा आनंद लुटला. या उपक्रमाची ॲग्रोवन वृत्तपत्राने दखल घेऊन त्यावर लिहिलेला लेख प्रकाशित केला. फराळ व पर्यटन दोन्ही मिळून ४ लाखांची उलाढाल गटांनी केली. याशिवाय सोयाबीनचे दूध उत्पादन केले व गावातील मुलांना प्रथिने वाढीसाठी दिले. त्यातूनही दहा हजारांपेक्षा जास्त उलाढाल केली. या शिवाय अन्य उत्पादन विक्री धरून ४.५ लाखांची विक्री प्रकल्पांतर्गत केली.

✻ **शेती व जोडव्यवसाय उत्पादने**: गांडूळखत प्रशिक्षण घेऊन प्रात्यक्षिकासाठी बेड तयार केला. नंदाताई काळे यांच्या मदतीमुळे शेण उचलण्याचे मशीन गावाला दिले. तर इनर व्हिल क्लबच्या मदतीने पिठाची गिरणी देऊन स्वयं रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली.

✻ **बायोगॅस** : अडवली व आस्कवडी गावातले शेणावर चालणारे पहिले २ बायोगॅस गावात बसवले.

☞ **कृषी विद्यापीठ दापोली सहल :** प्रकल्पांतर्गत गावातील २७ महिलांची सहल दापोली कृषी विद्यापीठ बघायला गेली. असे काही **कृषी विद्यापीठ** असते हेच बहुतेकींनी पहिल्यांदाच पाहिले.

**♦ संपदा प्रकल्प ♦**

वेल्हे तालुक्यातील ९ गावातील महिलांच्या रोजगारासाठी सायबेज कंपनीच्या सायबेज आशा ट्रस्टच्या अर्थसाहाय्यातून ऑक्टोबर २०२१ पासून संपदा प्रकल्प सुरू झाला. प्रकल्पामध्ये मंजाई आसनी, दामगुड आसनी, भागीनघर, सुरवड, वडगाव झांजे, सोंडे माथना, सोंडे कार्ला, सोंडे सरपाले, आणि सोंडे हिरोजी या ९ गावामध्ये ८० स्वयंरोजगार प्रशिक्षणे झाली.

☞ **शेती अनुभव सहल :** गावातील जीवनाचा परिचय करून घेणे आणि शेतीतील अनुभव घेणे यासाठी शहरातल्या लोकांच्या गावात अनुभव सहली आयोजित केल्या होत्या. अशा ३२ सहलीमध्ये १७१ जण येऊन गेले. यातून ५९,८५० रुपयांची उलाढाल झाली. व्यवस्थापनामध्ये एकूण २० महिलांनी सहभाग घेतला. सहलीत या गावातल्या महिलांनी उत्पादन केलेल्या वस्तूंच्या विक्रीचे स्टॉल ठेवले. त्यासाठी ४ गावातील महिलांकडून पेपर क्विलिंगचे मोबाइल स्टँड, छोट्या पर्स, स्लींग पर्स, मॅग्नेट असे उत्पादन करून घेतले. अशा वस्तूंची विक्री १७,१७६/–रु. झाली.

**♦ स्वाधार प्रकल्प ♦**

नोव्हेंबर २१ पासून पासली खोऱ्यातल्या ५ गावांसाठी कोफोर्ज कंपनीच्या अर्थसाहाय्यातून स्वाधार प्रकल्प सुरू झाला. त्यात ५ गावातील मुलांसाठी दल घेणे, स्वयंरोजगार प्रशिक्षण व शेतीसाठी काही प्रशिक्षणे असे करणे अपेक्षित आहे. त्याप्रमाणे सर्व गावात स्थानिक ताईला प्रशिक्षण देऊन दलाची सुरुवात झाली. गावाच्या मागणी प्रमाणे अस्कवडी गावातील सुभाष दसवडकर यांनी गांडूळ खत प्रशिक्षणे घेतली. प्रशिक्षण खूपच उपयुक्त ठरेल असे वाटते कारण आपल्यातल्याच कोणीतरी असे प्रयोग करून बधितले आहेत तर आम्ही पण नक्की करू असे लोकांच्या बोलण्यात आले. लोकांचा प्रतिसाद खूप चांगला वाटला.

नाळवट या गावात वरई लाडू बनवण्याचा प्रशिक्षण वर्ग झाला. या वर्गाला १० महिला उपस्थित होत्या.

स्वाधार प्रकल्पाची महिती लोकांना मिळावी म्हणून गावागावात बैठका घेतल्या. या बैठकीत प्रकल्पाची माहिती सांगून लेखी माहिती पत्रकही दिले. गावांमध्ये काय करायचे यावर बोलणे होऊन विकासकामांची यादीच तयार केली. सगळ्याच गावांमध्ये रोजगार गावातच मिळावा यावर जास्त वेळ चर्चा झाली.

**♦ राम सीता पुराणिक तंत्र निकेतन ♦**

शिवापूर येथल्या राम सीता पुराणिक तंत्र निकेतन येथे शिवण, खाद्यपदार्थ बनवणे, वेगवेगळ्या प्रकारच्या छोट्या पिशव्या, पर्स, स्लींग बॅग, रोटी रुमाल, पायपुसणे बनवणे, वाळवणे असे बनवण्याचे प्रशिक्षण वर्ग घेतले. वृत्त कालावधीत अशी १३ प्रशिक्षणे झाली. या प्रशिक्षणात १४३ जणींनी सहभाग घेतला. या महिलांनी वर्षभरात ६०,७९५/– रुपयांचे उत्पादन करून विक्री केली, त्यातून करणावळीचे रुपये २३,५०९/– महिलांनी मिळवले.

☞ **सौर शक्तीला बचत गटाची जोड** : दिनांक २१ जुलै ते २ ऑगस्ट या काळात महिलांसाठी सौर क्षेत्रातील प्रशिक्षण वर्ग शिवापूर येथे प्रथमच घेण्यात आला. त्याला ७ जणी आल्या. वर्गात छोट्या क्षमतेची सौर पट्टीका (solar panel) बनवायला शिकवले. या जोडीने सौर दिवे देखील बनवायला शिकवले.

**♦ ज्वाला प्रकल्प ♦**

ग्रामीण बाईचे लाकूडफाटा आणायचे काम वाचावे व पारंपारिक चुलीमुळे होणाऱ्या धुरातून मुक्तता व्हावी जेणे करून आयुष्य अधिक सुखकर व्हावे म्हणून पंखा असणारी अधुनिक चूल वापरणे व त्याला लागणारी इंधन कांडी शेतातील गबाळ वापरून तयार करणे असा ज्वाला प्रकल्प! या प्रकल्पाला आपण यंदा सुरुवात केली. चांदवण, पासली व कोलंबी गावाला मिळून ८० चुलींचे वाटप मिबा ड्राईव्ह टेक व कोफोर्ज कंपनीच्या अर्थसाहाय्यामुळे केले. वेल्ह्यातील दिघे आळीमध्ये इंधन कांडी बनवण्याचे काम वाल्मिकी बचत गटाने सुरु केले. त्यासाठी भांडवल अडोर कंपनी व अमेरिकेत वास्तव्यास असणाऱ्या पेंडसे कुटुंबियांनी दिले. इंधन कांडी उत्पादन महिला बचत गटाने केले असा हा पहिलाच प्रकल्प आहे.

**♦ अर्थसखी ♦**

ग्रामीण भागातील महिलांचे आर्थिक शहाणपण वाढावे, त्यांच्या उपलब्ध आर्थिक पुंजीमधून त्यांना विविध योजनांचा लाभ घेऊन जीवन सुरक्षा आणि पेन्शन यासारख्या सुविधांचा लाभ घेता यावा याकरिता रोटरी क्लब ऑफ पुणे गांधीभवन यांच्या मदतीने अर्थसखी प्रकल्प मार्च २२ पासून सुरु झाला. यामध्ये ५ गावातील ५ जणींना अर्थसखी म्हणून नियुक्त करण्यात आले. या अर्थसख्या गावातील इतर महिलांपर्यंत आर्थिक माहिती पोहोचवतील. या अर्थसख्या त्यांना बँकेत खाते काढणे, पेन्शन, विमा, चक्रव्याढ व्याज, कुटुंबाचा अर्थसंकल्प मांडणे अशा गोष्टी करायला मदत करणार आहेत. सुरुवात शिवापूर, कुसगाव, रांजे आर्वी आणि कल्याण या गावांपासून केली आहे.

**♦ खेळते भांडवल ♦**

छोटा व्ववसाय किंवा स्वयंरोजगार सुरू करायला लागणारे भांडवल कधी कधी वेळेत मिळत नाही म्हणून आपण खेळत्या भांडवलाची सोय केली. यातून बहुतेकींनी स्वतचा व्यवसाय सुरु केला. १४ गावातल्या २८ जणींना मिळून रु.४,८५,०००/– दिले. या भांडवलाची परत फेड व्यवस्थित होते आहे.

# ❖ नेतृत्व ❖

☞ **नवदिशा नेतृत्व प्रकल्प :** गावातील महिलेला बदल करण्याची प्रेरणा मिळाली आणि तिने पुढाकार घेतला की गावाचा चेहरा मोहरा बदलतो. म्हणून २५ गावांमधून २५ स्थानिक महिलांसाठी असे करण्याची संधी मिळावी यासाठी नेतृत्व प्रकल्प सुरु केला. नेतृत्व विकसनासाठी महिलेची आर्थिक साक्षरता वाढायला हवी, अनुभव संपन्नता मिळावी, दृष्टी विशाल व्हावी म्हणून सहलीचे आयोजन केले. आपण नेतृत्व गटातील महिलांचे या बाबतीत प्रशिक्षण करतो व त्या पुढे गावातल्या निवडक महिलांसाठी हेच उपक्रम राबवतात.

आर्थिक साक्षरता वाढायची तर अर्थ व्यवहार करायला शिकायचे म्हणून यंदा १६ महिलांची बँकेत खाती काढली. कुटुंबाचे अर्थसंकल्प तयार करण्याचे प्रशिक्षण ६० महिलांचे घेतले. या निमित्ताने असे कुठले खर्च असतात की ज्यात आपण बचत करू शकतो यावर महिलांनी प्रथमच चर्चा केली. बँक खाते काढण्यासाठी १४ जणींचे PAN कार्ड काढले. या महिला उत्पादन करत असणाऱ्या वस्तूंची २५००० रुपयांची विक्री केली.

☞ **सहल :** नेतृत्व गटाची पैठण सहल काढली. त्यात १४ गावातील ३० महिला सहभागी झाल्या होत्या. या सहलीचे नियोजन प्रकल्पातील महिलांनी स्वतः केले. पैठणचा नाथसागर पाहिला व एकनाथ महाराजांच्या मंदिराचे दर्शन घेतले. पैठणी खरेदी करण्याचाही आनंद लुटला. बहुतेक जणी प्रथमच मुक्कामी घराबाहेर राहिल्या. येताना पाचोडच्या आरोग्य संस्थेलाही भेट दिली.

गाव पातळीवर नेतृत्व करायचे म्हणून आग्रहाने गावात महिला ग्रामसभा घ्यायचे ठरवले. ५ गावांमध्ये २५ जानेवारी २०२२ रोजी प्रथमच महिला ग्रामसभा झाल्या. महिलांमध्ये या विषयीची जाणीव जागृती नसल्यामुळे ग्रामपंचायतीत महिलांच्या प्रश्नांवर अजून चर्चासुद्धा होत नाहीत. यासाठी प्रशिक्षण घेतले. महिलांच्या प्रश्नांची यादी करून ती यादी महिला ग्रामसभेत मांडण्याचे सर्वांनी ठरवले. पाणी प्रश्न, नळ योजना, महिला अस्मिता भवन, मुलांच्या अभ्यासासाठी गावात रचना, गावासाठी स्मशानभूमी, अंगणवाडी अशा गरजा पुढे आल्या आणि या प्रकल्पामुळे महिला ग्रामसभेत मांडल्या गेल्या.

**♦ नवरात्र मेळावे ♦**

गावागावात नवरात्री निमित्ताने स्त्री शक्तीचा जागर करण्यासाठी स्थानिक महिलांच्या पुढाकाराने मेळावे घ्यायचे ठरवले. सर्व नियोजन महिलांनी केले. गट अ मधील दुर्गम अशा २४ गावात ६३० जणी मेळाव्यात सहभागी झाल्या तर गट ब मधील २४ गावात ८०४ जणी अशा मिळून ४८ मेळाव्यात १४३४ जणी सहभागी झाल्या. या मेळाव्यात इतिहास रचणाऱ्या मुक्ताबाई, बहिणाबाई, चंदाताई तिवाडी, सिंधुताई सपकाळ यांच्या प्रेरणात्मक कथा गावातीलच महिलांनी वाचून दाखवल्या व एकत्र खेळ घेतले.

☞ **आरोग्य तपासणी :** मेळाव्याच्या निमित्ताने महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. रक्तातील साखर, हिमोग्लोबिन व रक्तदाब यासाठीच्या तपासण्या झाल्या. सगळ्यात जास्त हिमोग्लोबिन असणाऱ्या प्रत्येक गावातल्या एका महिलेला बक्षीस म्हणून साडी देउन तिचा सत्कार करण्यात आला. या वर्षीच्या २२ गावांमधल्या मेळाव्यामध्ये महिलांची आरोग्य तपासणी घेतली त्यात ५३९ लोकांनी सहभाग घेतला. मेळाव्यासाठी महिलांना दिलेल्या बक्षिसाच्या ७४ साड्या समाजातील हितचिंतकांनी देणगी दिल्या.

३० महिलांचे हिमोग्लोबिन १५ होते तर ४९ महिला ९.२ पेक्षा कमी हिमोग्लोबिन आहे असे आढळले. अपवादाने एकीचे हिमोग्लोबिन ५.३ होते. कमी हिमोग्लोबिन असणाऱ्या सगळ्यांची नावे शासन यादीत जातील आणि त्यांना औषधोपचार होतील असे पाहिले.

☞ **खेळ :** पारंपरिक खेळ, जसे की झिम्मा, फुगडी, कोल्हा आला असे तर झालेच पण त्या सोबत संगीत खुर्ची, तळ्यात मळ्यात, फुगा वाचवणे असेही गंमत खेळ घेतले. यामुळे महिला खूप मोकळ्या झाल्या. यामुळे करोनाचा विसर पडला, दडपण दूर झाले, अशी पावती अनेकींनी दिली.

☞ **प्रशिक्षण :** ६ गावात क्लिलिंगच्या वस्तू बनवण्याचे कौशल्य प्रशिक्षण दिले ज्यातून स्वयंरोजगार करता येईल.

## *शुभ दीपावली*

दिवाळी निमित्ताने एका कंपनीने क्विलिंगच्या ७००० दिव्यांची ऑर्डर दिली. पूर्णपणे हाताने करायच्या एका दिव्याला सुरुवातीला ३ तास तरी लागतात.... आणि या मागणीमुळे जणू विभागात स्वयंरोजगाराची चळवळच सुरु झाली! गावागावात ४ दिवसांत प्रशिक्षण वर्ग योजले. २२५ युवती, महिला यामध्ये सहभागी झाल्या पण हात चांगला असणाऱ्या, चिकाटीने करणाऱ्या त्यातल्या ३१ गावातल्या ८५ निघाल्या. १० दिवसांत ९००० दिवे उत्पादन केले. गावोगावी काम करणारी कार्यकर्ती तयार होती म्हणून इतक्या कमी वेळात एवढे उत्पादन शक्य झाले! २५–२७००० मनुष्य तासांचे काम झाले! कोण, कधी, कोणाला, कुठे सामान देणार आणि उत्पादन पोचवणार हे ३१ गावातल्या प्रमुखांनी केले केवळ म्हणूनच जमले. आयुष्यात अशा प्रकारची पहिलीच कमाई केलेल्या त्यापैकी ६२ जणी होत्या. यातून ४.२ लाखापेक्षा जास्त रक्कम करणावळ म्हणून या सगळ्यांनी मिळून मिळवली. अर्थातच त्यामुळे करोनाचे सावट जाऊन अनेक कुटुंबातील दिवाळी आनंदात साजरी झाली.

# ❖ व्यक्ती विकास ❖

## ♦ जास्वंद गिरीकन्या सहनिवास ♦

या वर्षी करोनाच्या छायेमुळे शासनाच्या सूचनेनुसार शाळा चालू-बंद होत होत्या. शासनाच्या या वेळापत्रका प्रमाणे मुली निवासात ये-जा करत होत्या. १०वी-१२वीच्या १२ मुली सगळ्यात जास्त दिवस मुक्कामी सहनिवासात होत्या. निवासात ५ वी ते पदवी पर्यंतच्या एकूण ३५ मुली होत्या. यंदाही सहनिवासातील १० वीच्या मुलींचा निकाल चांगला लागला, वैष्णवी महाडिक ८१%, नंदा कचरे ८१%, रविना जोरकर ७४%, सुरेखा जानकर ८६%, ज्ञानेश्वरी बावळेकर ८१% असे गुण मिळाले. त्यामुळे सगळ्यांची पुढे शिकायची शक्यता खूपच वाढली.

**विविध उपक्रमांद्वारे व्यक्तिमत्त्व विकसन आणि वृत्ती घडण**

१. **गुणवत्ता वाढ :** विविध कौशल्ये आणि विषय शिकून विद्यार्थिनींची गुणवत्ता वाढ व्हावी यासाठी आपण **शनिवार शाळा** असा उपक्रम सातत्याने करीत असतो. रोजचे वेळापत्रक वेगळे असले तरी शनिवारी काहीतरी मुलभूत वेगळे शिकायचे अशी ही कल्पना आहे. यात धनश्रीताई आणि सुधीरदादा यांनी योग, ध्यान घेतले आणि विज्ञानातील विविध प्रश्न, इंग्रजीतून पत्रलेखन तसेच अहवाल लेखनाचे प्रशिक्षण दिले.

२. **आपल्यापेक्षा लहान गटाचा अभ्यास घेण्याचे काम :** ३ महाविद्यालयीन मुलींनी ५ वी ते ८ वीच्या मुलांचा अभ्यास घेण्याचे काम मनापासून केले. याचा त्यांना त्यांच्या स्वतःच्या गणित आणि शास्त्राच्या संकल्पना स्पष्ट होण्यासाठीही उपयोग झाला.

३. **कामाची संधी :** कातकरी वस्त्यांवर चालू असलेल्या कामामध्ये १० युवतींनी जबाबदारी घेतली आहे. सुनिता कचरे आणि अश्विनी कोंढाळकर ह्यांनी विकास मित्र प्रकल्पात काम केले. या प्रकल्पाद्वारे वेल्हे तालुक्यातील शाळांमध्ये शैक्षणिक गुणवत्तावाढ आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तासिका, शिबिरे अशा अनेक उपक्रमांद्वारे काम चालते.

४. **उत्पादनात सहभाग :** दिवाळीच्या काळात ऑक्टोबर मध्ये ५ मुलींनी नसरापूर येथे जाऊन क्लिलिंगच्या पणत्या करण्याचे प्रशिक्षण घेतले. त्यांनी सर्वांनी मिळून ५०० पणत्या बनवण्याची ऑर्डर पूर्ण केली. त्याचे त्यांनी करणावळीचे रु. २०,०००/- मिळवले. मुलींनी पहिल्यांदाच असे पैसे मिळवले. काही जणींनी आपल्या कॉलेजची फी त्यातून भरली तर इतर जणींनी त्यांच्या स्वतःसाठी आणि घरातील लोकांसाठी खरेदी केली.

५. **संगणक वर्ग :** ४ जणींनी निवासामध्ये संगणक वर्ग पूर्ण केला.

६. **संवादिनी (हार्मोनियम) वर्ग :** नोव्हेंबर महिन्यापासून पुण्यातील गांधर्व महाविद्यालयाच्या परिणीताताई मराठे यांनी निवासातील मुलींचा संवादिनी वादन वर्ग घेतला. मुली आता जून महिन्यात असणारी गांधर्व महाविद्यालयाची पहिली परीक्षा द्यायची तयारी करत आहेत.

७. **निवासातील मुलिंचा दिवाळीच्या सुट्टीतील उपक्रम** : दिवाळीच्या सुट्टीत आपापल्या गावातील मुलांचे विज्ञान शिबिर घेण्याचा गृहपाठ निवासातील मुलींनी उत्तम प्रकारे पूर्ण केला. पद्य, खेळ, विज्ञान प्रयोग असा भरगच्च कार्यक्रम होता. निवासातील एकूण २४ मुलींनी या संधीचा लाभ घेतला. ११ गावातील १ ली ते ७ वी वयोगटाच्या १७२ मुलांचे शिबिर घेण्यात आले. ८ मुलींनी प्रथमच असे शिबिर आयोजित केले होते. निगडे येथील दलाच्या ताईंनी मुलींना मदत केली. या निमित्ताने अनेक गोष्टी मुली स्वतः होऊन पुढाकार घेऊन करायला शिकल्या.

८. **जास्वंद गिरीकन्या सहनिवासात सौर शक्तीतून वीजनिर्मिती :** ग्लोबंट कंपनीने केलेल्या आर्थिक सहयोगातून वेल्हे येथील मुलींच्या सहनिवासावर सौर शक्तीतून विज निर्मिती होइल अशी यंत्रणा उभारली.

## ♦ नवचैतन्य दल ♦

मुलांना शारीरिक व्यायामाची सवय राहावी, त्यांनी मैदानावर खेळावे यासाठी दलांची रचना उपयुक्त ठरते. करोनामुळे लागलेली मोबाईल वापराची सवय कमी व्हावी यासाठीही या उपक्रमाचा खूप उपयोग झाला. वेल्हे, हवेली आणि भोर या विभागातून एकूण ३७ गावांमध्ये दले सुरु झाली. दलामध्ये खेळ, विविध स्पर्धा आणि वेगवेगळी शिबिरे असा भरगच्च कार्यक्रम झाला. दलावरील मुलांसाठी स्वच्छता, लसीकरण असेही उपक्रम झाले.

☞ **फिरते वाचनालय भेट** : ऑगस्टमध्ये डॉ. प्राजक्ता दोशी यांनी मुलांकरिता फिरत्या वाचनालयासाठी पुस्तके भेट दिली. आता ७ गावातील ११० मुलांना याचा उपयोग होत आहे.

☞ **कुमारवयीन मुलींसाठी आरोग्याचे सत्र :** १० ते १२ वयोगटातील लहान मुलींसाठी आपल्या शरीराची ओळख या अंतर्गत मासिक पाळीची माहिती देण्यात आली. डॉ. प्राजक्ता दोशी यांनी हे सत्र घेतले.

☞ **खेळाच्या स्पर्धा :** ग्रामीण विभागत विविध प्रकल्पात मिळून ६० दले घेतली जातात. त्यातील १० दलांमधील १५० मुलांनी विविध खेळांच्या स्पर्धांमध्ये भाग घेतला. ५५ मुलांनी बक्षिसे जिंकली.

☞ **पोलीस स्टेशन भेट :** वेल्हे तालुक्यातील पोलीस स्टेशन मध्ये बाल स्नेह केंद्र सुरु होण्यासाठी बैठक झाली. प्रत्येक तालुक्यामध्ये तालुक्याच्या पोलीस स्टेशन मध्ये बाल स्नेह

केंद्र असते. सामाजिक संस्था असे केंद्र चालवतात. वेल्हे येथे असे केंद्र सुरु व्हावे म्हणून ज्ञान प्रबोधिनीच्या वतीने द्वारकाताई वालगुडे, राणी सुतार आणि तृप्तीताई कुलकर्णी या वेल्हे पोलीस स्टेशनच्या पोलीस इन्स्पेक्टर सुहास बांदल यांच्यासह बैठकीसाठी उपस्थित होत्या. अशा प्रकारचे बाल स्नेह केंद्र सुरु होण्याची गरज आहे असे सर्वानुमते ठरले.

☞ **ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे प्रवेशासाठी पूर्व चाचणी :** ज्ञान प्रबोधिनी प्रशाला पुणे येथील प्रवेश परीक्षेस ग्रामीण भागातील मुलांना बसता यावे यासाठी आधी ३० मुलामुलींची एक प्राथमिक परीक्षा गौरी ताई कुलकर्णी यांच्या मदतीने करंजावणे येथे झाली. त्यातील निवडक ५ मुलींनी पुण्याला येऊन प्रशालेची परीक्षा दिली.

☞ **शिवनेरी गडावर सहल :** दलाच्या १७ मार्गदर्शिकांची शिवनेरी गडावर सहल काढण्यात आली. त्यातील ८ जणी अशाप्रकारे पहिल्यांदाच घराबाहेर पडत होत्या.

☞ **प्रशिक्षक प्रशिक्षण :** खेळांच्या प्रशिक्षणा सोबत मुलींसाठी अनघाताई मराठे यांनी online प्रशिक्षण घेतले. यात मुलांच्या निरीक्षण नोंदी कशा ठेवाव्या याचे मार्गदर्शन केले गेले. दल घेणाऱ्या प्रशिक्षकांसाठी प्रशिक्षणे, वेगवेगळ्या सहली झाल्यामुळे त्यांचे नियोजन कौशल्य तसेच आत्मविश्वासही वाढला. वेळेत काम पूर्ण करण्याची सवय लागली.

☞ **बाल मेळावे :** डिसेंबरमध्ये शिवापूर येथे दलावरील ३ गावांतून ४५ मुलांचा बाल मेळावा झाला. मुलांना छोट्या छोट्या गोष्टी आणि चरित्रे सांगितली. तसेच गोष्टीरूपात ज्ञान प्रबोधिनीची माहिती त्यांना सांगितली. मुलांनी विविध खेळ खेळले आणि चित्रे काढली. दुसरा मेळावा आंबवणे सरस्वती विद्यालय येथे ३री ते ५वी वयोगटातील १३३ मुलामुलींचा झाला. या मेळाव्यात 'मोबाईल, मित्र का शत्रू' या विषयावर गटचर्चा झाली, क्विलिंग पेपरचे भेटकार्ड करणे, टाकाऊतून टिकाऊ वस्तू बनवणे, फुग्याचे खेळ खेळून मुलांनी मजा घेतली.

वेल्हे ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर शिवाजी कुरुणकर हे प्रमुख पाहुणे होते. त्यांनी सर्वांसाठी कोविडसाठी घ्यायची काळजी असे सत्र घेतले.

☞ **गाव मेळावे :** ज्ञान प्रबोधिनी पुण्याच्या प्रशालेतील 'ग्राम विकसन' हे उद्दिष्ट ठेऊन अभ्यास करणाऱ्या ९ वीतील मुलींनी ७ गावातील ७ ते १३ वयोगटातील १७२ मुलांचे मेळावे घेतले. त्यात खेळ, गोष्टी, पद्य असे घेतले.

## ♦ हिरकणी ♦

२०१४ पासून सुरु झालेल्या या प्रकल्पातून साधारण ८५० माता पालिका आजवर सहभागी झाल्या आहेत. गावागावातून हिरकणी मातांचा या निमित्ताने संपर्क वाढला. वेल्हे आणि हवेली तालुक्याबरोबर आता भोर तालुक्यात प्रासंगिक काम सुरु केले आहे. वृत्त कालावधीत भोर मधली ८ गावे तर वेल्ह्याच्या पासली खोऱ्यातील ५ गावे अशा १३ गावांमध्ये मिळून १४४ महिलांनी या उपक्रमात सहभाग घेतला. घरात उपलब्ध साधनांचा मुलांच्या विकासासाठी कशाप्रकारे वापर करता येइल याविषयीचे हे प्रशिक्षण आहे. महिन्यातून एक कृतिसत्र आणि एक प्रशिक्षण अशा दोन गोष्टी करून महिनाभर त्याचे प्रात्यक्षिक केले जाते. असा हा वर्ग १४४ जणींनी पूर्ण केला.

☞ **पूर्वसंपर्क :** गावात माता पालिकांच्या भेटी आणि त्यांच्यासाठी विविध मेळाव्यांचे आयोजन करून पूर्वपिठीका तयार करण्यात आली. त्यानंतर प्रशिक्षकांचे अनुभव सत्र होऊन मग प्रत्यक्ष सत्रांना सुरुवात झाली.

☞ **प्रशिक्षिकांची शैक्षणिक गुणवत्ता वाढः** माता प्रशिक्षणातील प्रशिक्षकांचे ज्ञान वाढावे यासाठी डॉ. ज्योत्स्ना पडळकर, डॉ. शुभांगी कानिटकर, डॉ. प्राजक्ता दोशी यांचे online मार्गदर्शन झाले.

☞ **पुढील गावात सत्रे झाली :** कासुर्डी, नसरापूर, हातवे खुर्द, सणसवाडी, सांगवी, खंडोबा माळ, संगमनेर, आळंद, येवली, माळवाडी, पासली, शेनवड आणि बालवड या गावात १६ जणींनी सत्रे घेतली.

## ♦ विद्यार्थिनींसाठी अन्य उपक्रम ♦

**१. कला वर्ग :** करंजावणे आणि शिवापूर येथे चालू आहेत. त्यासाठी १० हार्मोनियम विकत घेतल्या. २० मुली कला वर्गात संवादिनी शिकण्याचा लाभ घेत आहेत. त्यातील ७ विद्यार्थिनींचे ७ राग शिकून झाले आहेत.

**२. किशोरींचे निवासी नेतृत्व शिबिर, वेल्हे :** आरोग्य सखी प्रकल्पाशिवायच्या इतर ११ गावातील २६ किशोरींचे २ आणि ३ ऑक्टोबर रोजी निवासी शिबिर वेल्हे येथे झाले. शिबिराचा विषय नेतृत्व असा होता. स्वतः कधी कुठे कसा पुढाकार घेतला हे प्रत्येकीने सांगितले. पुढाकार घेण्यासाठी आत्मविश्वासाची गरज आहे. स्वतःच्या क्षमतांची ओळख असावी लागते आणि संधी आली की ती घेण्याची वृत्ती लागते अशी चर्चा गटात झाली. मुलींनी तोरणा गडावर उपासना केली.

### तज्ज्ञांची सेवाभावी मदत

गाव पातळीवर काम करणाऱ्या १७० कार्यकर्त्या मानधन घेऊन काम करतात. त्यांच्याच बरोबरीने शहरातील हितचिंतकही सेवाभावाने काम करतात. वैशाली बिनिवाले, शुभांगी कानिटकर, प्राजक्ता दोशी, वैदेही केळकर या डॉक्टर आहेत तर परिणीता मराठे संगीत शिक्षणासाठी, अनया मराठे समुपदेशनासाठी, मृदुला केळकर युवती प्रशिक्षणासाठी योगदान देणाऱ्या पुणे प्रशालेच्या माजी विद्यार्थिनी सुद्धा आहेत. अनया साबणे, देशमुख यांच्या सारख्या भरतकाम तज्ज्ञ आहेत की ज्यांच्यामुळे स्वयंरोजगाराची नवी दिशा मिळाली

पथनाट्या, गटचर्चा आणि हस्त कौशल्यामध्ये पेपर क्विलिंगचे दिवे बनवायला मुली शिकल्या.

### ♦ युवती विकास उपक्रम ♦

**१.नियमित विकास तासिका :** विंझरच्या अमृतेश्वर महाविद्यालयामध्ये वर्षभरात युवती विकासाच्या तासिका घेतल्या. डॉ. संगीता कोहली यांनी **'जोडीदार निवडताना'** यावर सत्र घेतले. विविध उपक्रमांच्या आधारे जोडीदार निवडताना कोणत्या गोष्टींना प्राधान्य दिले जावे यावर चर्चा घेतली. स्त्री–पुरुष संपूरकतेवरील सत्रे झाली. मुले आणि मुली यांची ही एकत्रित सत्रे असली तरी अत्यंत खेळीमेळीत पार पडली. अत्यंत अवघड असा विषय साधनाताई सेठिया यांनी खेळांच्या माध्यमातून खूप चांगल्या पद्धतीने घेतला. या शिवाय सत्रात मुलींची रक्त तपासणी झाली. हिमोग्लोबिनचे प्रमाण तपासण्यात आले.

**२. विशाखा समिती अंतर्गत प्रशिक्षण :** अमृतेश्वर कॉलेज, विंझर या कॉलेजमध्ये वर्षभरात विशाखा समिती अंतर्गत असणाऱ्या योजनांवर आधारित वर्षभरात ४ तासिका घेतल्या. पहिली तासिका महिला तक्रार निवारण कक्ष यावर घेतली. राज्यपातळीवरील शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी मा. सुवर्णाताई गोखले यांनी मार्गदर्शन केले. यात दूरस्थ पद्धतीने जवळपास ८५ जण सहभागी झाले होते. दुसऱ्या तासिकेला लिंग समानता यावर मा. गौरीताई कापरे यांनी ७० जणांना मार्गदर्शन केले. तिसरी तासिका प्रत्यक्ष झाली. यामध्ये वैयक्तिक स्वच्छता यावर डॉ. संगीता कोहली यांनी ९० विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. काही जणींनी मोकळेपणाने प्रश्न विचारून शंका निरसन केले. चौथी तासिका निर्भय कन्या योजने अंतर्गत घेतली. त्यात विवाहपूर्व समुपदेशन हे सत्र घेण्यात आले. साधनाताई सेठिया व विशाखाताई वेलणकर यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींनी मोकळेपणाने प्रश्न विचारात माहिती जाणून घेतली. ९५ विद्यार्थिनी या सत्राला उपस्थित होत्या.

**३. स्वयंरोजगार प्रशिक्षण :**

अ. संगणक वर्गाला सुरुवात झाली, १२ मुली सहभागी आहेत.

आ. मणीकामाचा वर्ग झाला. त्याला ११ जणी होत्या.

इ. क्विलिंग आणि भरतकामाचा वर्ग झाला. १२ जणी होत्या.

ई. जोरकर वाडी आणि कोंढाळकर वाडी येथे ५ युवतींनी प्रशिक्षण घेऊन साडेसात किलो करवंद जाम बनवला.

**४. १०वी व १२वी पुढील मार्गदर्शन :** या वर्षी सरस्वती विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय, आंबवणे या कॉलेजमध्ये १०वी व १२ च्या ११० विद्यार्थ्यांना व संगणक वर्गाच्या ११ विद्यार्थिनींना प्रतिभा स्वामी यांनी मार्गदर्शन केले.

**५. युवतींचा जास्वंद कौशल्य विकास वर्ग : यु**वतींच्या अनौपचारिक प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून आपण १० वर्षांपासून युवतींसाठी जास्वंद नावाने कौशल्यांचे वर्ग चालवत आहोत. आठवड्यातून ५ दिवस, ३ तास असा घेतला जातो. यामध्ये ८–१० हस्तकौशल्ये–क्विलिंग दागिने, धाग्याचे दागिने, भरतकाम, रांगोळी, मेंदी, क्विलिंग दिवे, शिवण, मणीकाम असे शिकवले जाते. शिवाय जीवन कौशल्यामध्ये संवाद, सहजीवना विषयी सत्र घेतली जातात.

> **ग्रामीण उत्पादनांच्या माहितीसाठी संपर्क करा**
>
> ▶ वर्षभरात पुण्याच्या प्रबोधिनीतील स्टॉलवरून ग्रामीण महिलांनी बनवलेल्या उत्पादनांची रु. ४.१८ लाख विक्री झाली.
>
> ▶ फक्त कृषी पर्यटन शुल्क व त्यांनी केलेल्या खरेदीची उलाढाल रु. ३.५ लाखांपेक्षा जास्त झाली.
>
> ▶ व्हॉटस् ग्रुपवरून माहिती मिळाली, त्याला प्रतिसाद देऊनही अनेकांनी खरेदी केली. आपले नाव ८६६८४८८३४० या नंबरवर मेसेज करून कळवल्यास आपल्यालाही ग्रामीण जीवन परिचय सहली किंवा ग्रामीण उत्पादनाची माहिती मिळू शकेल.

☞ **जास्वंद प्रशिक्षक प्रशिक्षण वर्ग :** वर्गाची पूर्वतयारी म्हणून गावपातळीवर एक दिवसाचे वर्ग घेतले. ७ गावातून १८ जणी जास्वंद वर्गांना शिकवण्यासाठी वर्गाला आल्या होत्या. क्विलिंगचे कानातले, धाग्याचे दागिने आणि कापसाचे हार अशी चार गटात चार कौशल्ये शिकवण्यात आली.

**१ आंबवणे–शिवापूर जास्वंद वर्ग** : या वर्गाला मार्गासनी, अडवली, आस्कवडी, पारवडी या गावातून २५ मुली येत होत्या. मुलींनी तयार केलेल्या वस्तू अडोर कंपनी येथे विक्रीसाठी ठेवल्या होत्या. कंपनीच्या परिसरात मुलींनी सजावट केली आणि दिवाळीच्या वेळेस स्टॉल लावला होता.

**२ कोदवडी जास्वंद वर्ग** या वर्गाला जवळच्या ४ गावातून २७ मुली येत होत्या. त्यांची अभ्यास सहल सिंहगड व फरसाणाचा कारखाना बघायला नेली होती.

**३ नसरापूर जास्वंद वर्ग** या वर्गाला जवळच्या ६ गावातून १७ युवती येत होत्या. नियमित तासाशिवाय पार्लरचा वर्ग व बँकेविषयी माहिती या वर्गात देण्यात आली.

☞ **संधी :** युवतींना विविध कामाचा अनुभव मिळावा म्हणून आपण वेल्हे भागात सुरू असलेल्या वेगवेगळ्या प्रकल्पांमध्ये काम करण्याची संधी दिली. याचा लाभ ४२ युवतींनी घेतला.

☞ **स्कॉलरशिप :** या वर्षी १२वीच्या शिक्षणासाठी ६, संगणक शिक्षणासाठी २ तर पदवी, नर्सिंग फॅशन डिझाईन अशा २ वर्षांच्या कोर्सला ९ अशा मिळून १७ जणींना ३,४३,५००/– रुपये स्कॉलरशिप दिली.

## ❖ वंचित गटासाठी काम ❖

### ♦ कातकरी विकास प्रकल्प ♦

☞ **नियमित सत्रे :** वेल्हे तालुक्यातील ४ कातकरी वस्त्यांवर ६ ते १५ वयोगटातील ९७ मुला–मुलींसाठी नियमित सत्रे घेण्यात आली. या मुला–मुलींची शिक्षणाची प्रेरणा वाढत जावी याकरिता सत्रांचे नियोजन करण्यात आले होते. तसेच याचबरोबर चांगल्या सवयी लागण्यासाठी वेगवेगळे उपक्रम घेऊन आणि सत्रांच्या माध्यमातून विषय पोहोचविण्यात आले. खेळातून अभ्यास (मराठी, गणित, इंग्रजी), स्वच्छता (परिसर स्वच्छता, आरोग्य स्वच्छता), खेळ (बौद्धिक खेळ, मैदानी खेळ), हस्तकौशल्य असे विषय घेण्यात आले. कोविडनंतर जुलै महिन्यापासून आठवड्यातून दोन प्रमाणे सत्रे घेण्यात आली. कोंढवली (५४) मालवली (५५) धानेप (३२) चेलाडी (४४) अशी एकूण चार वस्त्यांवर मिळून १८५ सत्रे मुला–मुलींसाठी घेण्यात आली.

☞ **खेळाच्या स्पर्धा :** मुलांची शारीरिक व बौद्धिक क्षमता वाढीस लागावी याकरीता वर्षभरात वेगवेगळे खेळ मुलांना शिकवले जातात. त्याचबरोबर खेळाची आवड निर्माण व्हावी यासाठी खेळाच्या स्पर्धेचे नियोजन केले जाते. यावर्षी दोरीच्या उड्या, पोत्यातील उड्या, लिंबू–चमचा, बेडूक उड्या, पळणे अशा वेगवेगळ्या स्पर्धा घेऊन तीन नंबर काढण्यात आले. तसेच बक्षीस वाटप कार्यक्रम घेण्यात आला. तीन वस्त्यांवर मिळून ५० मुले–मुली स्पर्धांमध्ये सहभागी झाले.

☞ **१५ ऑगस्ट कार्यक्रम :** कोंढवली, मालवली, चेलाडी या तीन वस्त्यांवर कार्यक्रम घेण्यात आला. हा दिवस का साजरा केला जातो अशी माहिती सांगण्यात आली. त्यानंतर समूहगायनाचा कार्यक्रम झाला. प्रतिज्ञा व राष्ट्रगीत ही घेण्यात आले. तसेच वस्त्यांवर घेण्यात आलेल्या खेळाच्या स्पर्धांचे बक्षीस वाटप व खाऊ वाटप करण्यात आले.

☞ **सहल :** मालवली, कोंढवली, चेलाडी या तीन वस्त्यांवरील ३८ मुले–मुली व ११ ताई अशी ४९ जणांची एकदिवशीय सहल सज्जनगड येथे जाऊन आली. गडावर गेल्यावर तेथील इतिहास सांगून गड फिरण्याचा आनंद घेतला. तसेच सातारा येथील छत्रपती संभाजी महाराज उद्यान येथे खेळले. जवळपास ३० जणांनी गडावर जाण्याचा व उद्यानात खेळण्याचा आनंद पहिल्यांदाच घेतला.

☞ **आनंदी शिबिर :** कोंढवली, मालवली, चेलाडी या तीन वस्त्यांवरील ३० मुला–मुलींचे दोन दिवसांचे आनंदी शिबिर झाले. या शिबिरात मुलांनी पहिल्यांदाच विज्ञान प्रयोग करून बघण्याचा अनुभव घेतला. हवेचा दाब, भिंगाचा वापर करून कागद जाळणे, तरंगणे–बुडणे, गुप्त संदेश असे सोपे प्रयोग प्रत्येकाने गटागटात करून बघितले. सर्वांना चित्रांच्या माध्यमातून सूर्यमाला समजावून सांगण्यात आली. वेगवेगळे स्मरणशक्तीचे खेळ घेण्यात आले. तसेच लोकरीपासून फुले बनवून हार, तोरण बनवण्याचा आनंद मुलांनी घेतला.

हे शिबिर मुख्यत्वेकरून शिक्षण व स्वच्छता हे दोन विषय मुलांपर्यंत पोहचवण्यासाठी घेण्यात आले. त्यामुळे मुलांना 'दप्तर' ही शॉर्ट फिल्म दाखवून चर्चा घेतली. त्यानंतर निवासातील मुलींनी शिक्षण व स्वच्छता या दोन विषयांवर पथनाट्य सादरीकरण केले. खजिना शोध, फुगे फोडणे, अडथळा पार करणे असे वेगवेगळे गंमत खेळ खेळण्याचा आनंद सर्वांनी घेतला. वस्तीवरील बहुतेक मुलांकडे चप्पल नसल्याने शिबिर संपल्यावर सर्वांना चप्पल खरेदी करून देण्यात आली.

☞ **दिवाळी सण :** कातकरी समाज हा मासेमारी बरोबरच रोजंदारीवर काम करणारा गट आहे. या समाजात सगळेच सण साजरे केले जात नाहीत. दिवाळी कामाच्या दिवसांत येत असल्यामुळे दिवाळी साजरी केली जात नाही. म्हणून आपण या वर्षी संपर्कातील १४ कातकरी वस्त्यांवर दिवाळी साजरी केली. दिवाळीच्या दिवसांमध्ये वस्तीवर गेल्यावर स्वच्छता करायला सांगून अंगणात काढण्यासाठी रांगोळी व पणत्या दिल्या. सर्वांना दिवाळी फराळ किट वाटप केले. शेवटी सर्वांनी एकत्र फराळ केला. अशी दिवाळी २०० कुटुंबां–सोबत साजरी केली.

☞ **महिला मेळावा :** महिला दिनानिमित्त ९ वस्त्यांवरील मिळून ४२ महिलांचा मेळावा घेण्यात आला. महिलांनी गाणी म्हटली. आपल्या उपक्रमांबद्दल माहिती सांगितली. कातकरी कार्यकर्ती पार्वतीताई यांनी कोंढवली, मालवली वस्तीवर सुरू असलेल्या कामाचे निवेदन केले. वस्तीवरील अडचणींवर चर्चा घेतली. वेगवेगळ्या स्पर्धा घेऊन बक्षीस वाटपही केले. पहिल्यांदाच मेळाव्यात सहभागी झालेल्या प्रत्येकीला सौर दिवे देण्यात आले. मा. बागेश्रीताई पोंक्षे यांनी मार्गदर्शन केले.

☞ **वाटप :** मालवली, कोंढवली, धानेप, चेलाडी या चारही वस्त्यांवर लहान मुलांसाठी व मोठ्यांसाठी कपडे वाटप करण्यात आले. मालवली वस्तीवर अंथरूण पांघरूणे व कोंढवली वस्तीवर ३० कुटुंबांना शिधा वाटप करण्यात आला.

**विशेष !**

- ▶ लहान मुला–मुलींसाठी सुरू असलेल्या वस्त्यांवरील कामामुळे नियमित शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आता ३८ झाली आहे.
- ▶ बचत गट सुरु करण्याची मागणी आल्यामुळे या वर्षी तीन बचत गट सुरू झाले.
- ▶ जागृती कार्यक्रमामुळे आरोग्य व परिसर स्वच्छतेत बदल दिसून येत आहेत.

### ♦ एकल महिला ♦

या कामाचे हे सहावे वर्ष! गेल्या काही वर्षात १० जणींना संजय गांधी निराधार योजना, ३ जणींना श्रावण बाळ योजना व कुटुंब आधार योजनेची माहिती देऊन शासकीय योजनांचा लाभ मिळवून दिला. त्यामुळे अनेकींच्या खात्यावर महिना ८००-१०००/- जमा व्हायला लागले.

☞९ एकल महिलांना खेळते भांडवल म्हणून प्रत्येकी रु. १०,०००/- दिले तर ३ जणींच्या मुलांना शिक्षणासाठी स्कॉलरशिप दिली.

☞ **मेळावा :** वेल्हे येथे २६ गावातल्या ६० एकल महिलांचा मेळावा झाला. वेल्ह्याच्या मेळाव्याला शासकीय अधिकारी चव्हाण सर आले होते. त्यांनी स्वतः सर्व योजनांची माहिती सांगितली व मदतीचे आश्वासन दिले. पुन्हा एकदा लक्षात आले की योजनेच्या लाभार्थी होण्यासाठी या महिलांना 'अस्तित्वात' यावे लागेल. नवऱ्याने सोडून दिलेल्या महिलेकडे ना असते आधार ना रेशनकार्डवर नाव मग 'ती'चे अस्तित्व सिद्ध करणे हे पहिले काम असते.....कधी एखाद्या विधवेचे नाव पोरं झाल्यामुळे रेशनकार्डवर असतेही पण पेंशनसारखे दरमहा पैसे मिळायला तिचे मुलांसह वेगळे रेशनकार्ड असणे गरजेचे असते. ..... पण या पुरुषप्रधान समाजात **माझे वेगळे कार्ड काढून द्या म्हणायची हिंमतच विधवेकडे नसते....** मग घरच्यांना पटवायला कार्यकर्त्यांचे संवाद कौशल्य पणाला लावावे लागते. त्याशिवाय योजनेसाठी पात्र लाभार्थी तयार होत नाही! एकल महिलांसाठी योजना आहेत पण त्या लागू करण्यासाठी महिला अधिकारी असतील तर निःसंकोचपणे संवाद साधता येईल.... असेही कोणीतरी शासनाला सांगायला हवेच आहे.

## ❖ स्फुट ❖

☞ **यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाद्वारे शिक्षण:** ग्रामीण भागात शिक्षण पूर्ण करण्यात अनेक अडचणी येतात, त्यामुळे अनेकांचे शिक्षण अपूर्णच रहाते. २०१२ पासून आपण यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक येथील दूरस्थ शिक्षण उपक्रम सुरु केला. या उपक्रमांतर्गत २०२१ पर्यंत १७५ व्यक्तींनी (त्यात १५०+ जणींनी) १०वी १२ वी समकक्ष परीक्षा दिली. त्यात उत्तीर्ण झाले की प्रथम वर्षाला प्रवेश घेतला. आजपर्यंत २० पेक्षा जास्त जण पदवीधर झाले. या वर्षीही म्हणजे २०२१ जूनमध्ये खालील प्रवेश झाले. १२वी समकक्ष ५, F.Y.- 4, S.Y.-2, T.Y.- 2, पदव्युत्तर- २. या दूरस्थ शिक्षणाचा, अंगणवाडीताई, आशासेविका तसेच इतर शासकीय सेवेत असलेल्या व्यक्तींनाही उपयोग होत आहे. ग्रामीण भागातील महिला, गटाच्या प्रेरणेने कुटुंबातील सर्व जबाबदाऱ्या सांभाळून पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करत आहे. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास तर वाढतो आहे. यामुळे त्यांच्या कुटुंबात विधायक बदल घडताना दिसत आहेत. यासाठी प्रत्यक्ष फॉर्म भरणे, अभ्यास करणे, पुस्तके आणणे, online परीक्षेसाठी लागेल ती मदत करणे असे आपण पुढाकार घेऊन करत आहोत म्हणूनच हे शक्य होत आहे.

☞ **योगवर्ग :** पुण्यातील श्रिया संस्थेच्या माधुरीताई केळकर यांच्या पुढाकाराने दि. २८ मे ते १५ जून या काळात ऑनलाईन योगवर्ग घेण्यात आला. यामुळे ग्रामीण महिलांना योगाची गोडी लागली. ४९ जणींनी सहभाग घेतला. २८ जणींनी ६०% वर्ग केला. श्रियाच्या ६ मार्गदर्शिका वर्गाला येत होत्या. १६ जणींनी या वर्गाची परीक्षा देऊन प्रमाणपत्र मिळवले.

२१ जून या जागतिक योगादिना निमित्ताने आपापल्या ठिकाणाहून एकाच वेळी एका सामूहिक कृतीचा भाग होण्याचे आवाहन केले. पण शेतकामामुळे २ गटात विभागणी केली. सकाळी ७ ते ८ च्या गटात ९ ठिकाणाहून २७ जणी तर दुपारच्या ३ ते ४ गटात १४ ठिकाणाहून ७९ जण अशा एकूण १०६ जण सहभागी झाले होते. दलावरच्या बालचमू पासून ते नऊवारीतील महिले पर्यंत सर्व वयोगटातील लोकं आपापल्या गटप्रमुख ताई सोबत योगासन - प्राणायाम करायला सहभागी झाले होते.

☞ **कार्य विकासः** भवितव्य लेख बैठक: १० वर्षांपूर्वी लिहिलेल्या भवितव्य लेखाचा कालावधी पूर्ण होत आला असल्याने, नव्याने पुढच्या १० वर्षांमध्ये काय काम करायचे असे नियोजन करणारा भवितव्य लेख लिहिण्याची प्रक्रिया सुरू झाली. त्यांची एक बैठक ३ डिसेंबर रोजी झाली. त्याला गावात काम करणाऱ्या ७० कार्यकर्त्या आल्या होत्या. काम करणाऱ्यांनी विचार करायचा असे ठरवून आपण कार्यकर्त्यांच्या चर्चेतून पुढील १० वर्षांसाठीचे नियोजन केले. कामाचे मध्यंतर उद्दिष्ट, त्यासाठीचे उपक्रम, त्यांची निष्पत्ती, मनुष्यबळ, अर्थबळ मांडले.

**मातृमंदिर विश्वस्त संस्थेचा आदर्श माता पुरस्कार**

स्त्री शक्ती प्रबोधन ग्रामीणच्या कार्यकर्त्या मा. द्वारकाताई वालगुडे यांना निगडीच्या मातृमंदिर विश्वस्त संस्थेचा राधामाता पुरस्कार ३० जुलै २०२१ रोजी देण्यात आला. ग्रामीण भागातील दुर्गम प्रदेशात राहणाऱ्या मुलींना शिक्षणाची प्रेरणा देण्याच्या त्यांच्या कामाचा गौरव त्यानिमित्ताने करण्यात आला.

### ♦ कामास विविध मान्यवरांची भेट ♦

**१. निर्जरा फौंडेशनच्या सदस्यांची पासलीच्या शाळेस भेट :** निर्जरा फौंडेशनच्या १५ महिला सदस्यांनी पासलीच्या शाळेसाठी वाचनालय उपलब्ध करून दिले. दलांवर खेळण्यासाठी उड्यांच्या दोऱ्या, चेंडू, लेझीम अशा साहित्याचे ५ संपूर्ण संच भेट म्हणून दिले. तसेच महिलांना साड्या भेट दिल्या. ७० महिला व पासलीच्या शाळेचे मुख्याध्यापक कार्यक्रमास उपस्थित होते.

**२. जम्मू काश्मीर मधील १५ शिक्षकांची वेल्हे कामाला भेट :** काश्मीर मधले बनी ह्या पाकिस्तान हद्दीजवळील गावातील १५ शिक्षकांची वेल्ह्याच्या कामाला भेट दिली. त्यांना किशोरी विकास, प्रज्ञा विकास आणि हिरकणी उपक्रमाचा परिचय करून दिला आणि कार्यकर्त्यांच्या भेटी झाल्या. एकल महिलांचे कामही त्यांनी समजून घेतले. तोरणा किल्ल्याला भेट दिली. वेल्ह्याच्या यात्रेचाही त्यांनी अनुभव घेतला.

**कामाची दखल**

लोकसत्ताच्या चतुरंग पुरवणीमध्ये आपल्या करोना संबंधित केलेल्या कामावर लेख छापून आला.

**३. वनवासी कल्याण आश्रमाचे मा. श्री. संदीपजी कवीश्वर आणि मा. जयरामजी यांची कामाला भेट :** वनवासी कल्याण आश्रमाचे अखिल भारतीय संघटक संदीपजी आणि महाराष्ट्र प्रांताचे जयरामजी यांची वेल्हे निवासाला आणि कातकरी समाजाच्या कामाला भेट दिली.

**४. सोनदरा गुरुकुलातील ७ शिक्षक :** आंबवणे आणि वेल्हे केंद्रातील कार्यकर्त्यांच्या त्यांनी भेटी घेतल्या. वेगवेगळ्या प्रकल्पांची माहिती घेतली, कोंढवली कातकरी वस्तीवर गुरुकुलातील शिक्षकांनी भेट दिली.

**५. कंपनीच्या अधिकाऱ्यांची भेट :** अडोर डिजी. कंपनीच्या आर्थिक साहाय्यातून झालेल्या युवतींच्या जास्वंद प्रशिक्षण वर्गांचा समारोप झाला. या निमित्ताने मुलींना भेटायला हे अधिकारी आंबवणे येथे आले होते. शिवापूर येथील कृषी तांत्रिक विद्यालय, महिलांचे काम, वेल्हे येथील गिरीकन्या निवास, मालवली येथील कातकरी वस्तीतील पालकांची भेट असे सर्व या अधिकारी गटाने पाहिले. या कंपनीच्या आर्थिक मदतीमुळे आपण विजेवर चालणारी रिक्षा घेतली. जास्वंद कौशल्य प्रशिक्षण वर्गाच्या मुलींच्या येण्याजाण्यासाठी आपण ही रिक्षा वापरत आहोत.

**६. बिवलकर देणगी :** सुहासिनी बिवलकर यांना ७५ वर्षे पूर्ण झाली या निमित्ताने त्यांनी ७५ जणींना भेटवस्तू दिल्या. यात स्वयंरोजगारासाठी वजन काटा व सिलिंग मशीन व इमरजन्सी दिवे, छत्री, पिशव्या अश्या वस्तू दिल्या. आंबवणे येथील कार्यालयात त्यांच्या हस्ते महिलांना भेटी दिल्या.

**७. सौरऊर्जेवर चालणारी प्रकाश योजना भेट:** ग्लोबंट कंपनीने या वर्षी आपल्याला विविध प्रकारे सहकार्य केले. दिवाळी दिव्यांची ऑर्डर देऊन मोठी रोजगार संधी दिली तर त्यांच्या कर्मचारी वर्गाने भागातील गरजूंना फराळ वाटप करायला अर्थसाहाय्य दिले. त्याच बरोबर कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून वेल्हयाच्या सहनिवासाच्या छतावर सौरऊर्जेवर चालणारी प्रकाश योजना करून दिली. हे सगळे बघायला आणि निवासातील मुलींना भेटायला ग्लोबंट कंपनीचे ४ अधिकारी येऊन गेले.

### विशेष वार्ता

मंगला गोडबोले यांचे बचत गटावर **थेंबे थेंबे तळे साचे** हे पुस्तक प्रकाशित झाले. मंगलाताई यांनी प्रत्यक्ष पुणे कार्यालयात येउन काही बचत गट प्रमुखांच्या भेटी घेतल्या तर काहींशी फोन वरून संपर्क साधला काही प्रमुखांना शिवऱ्याला जाऊन त्या भेटल्या आणि आपल्या कामावर सकाळ दिवाळी अंकात त्यांनी प्रदीर्घ लेख लिहिला. त्या लेखाचा अंतर्भाव असलेले 'थेंबे थेंबे तळे साचे' हे पुस्तक २३ डिसेंबर रोजी प्रकाशित झाले.

**सौर दिवा देणगी उपक्रम**

दीप पूजन किंवा दिव्याची अवस या दिवशी आपण देणगीदारांना आवाहन केले की रु. ९५१/- देणगी दिलेत तर त्यातून एका गरजू ग्रामीण कुटुंबाला एक सौरदिवा भेट देता येईल. ह्या सौर दिव्याचे उत्पादन प्रबोधिनीचा सौर उपकरण निर्मिती विभागातर्फे ग्रामीण महिला करणार होत्या. रोजगार निर्मिती हाही हेतू होताच. लोकांना ही कल्पना आवडली. काहींनी ५-१० किंवा त्यापेक्षाही जास्त असे दिवे देणगी दिले. १९२ दिव्यांची रक्कम आठवडाभरातच जमा झाली. अमावास्येचा मुहूर्त साधून पहिल्या दिव्यांचे वाटप झाले. एकल महिला, कातकरी, धडपड्या कार्यकर्तीचे कुटुंब अशा कुटुंबांना दिवे दिले.

अमेरिकेमध्ये नोंदणी केलेली ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशन ही संस्था ग्रामीण महिलांच्या कामाला भरीव अर्थसहाय्य करते. एवढेच नाही तर आपले काम कशा पद्धतीने मांडायचे याचे ही मार्गदर्शन करते. फाउंडेशनचे पदाधिकारी आले की पुणे कार्यालयाला हमखास भेट देतात. ग्रामीण महिलांनी बनवलेल्या उत्पादनासाठी विक्रीलाही मदत करतात.

**ज्येष्ठांचे मार्गदर्शन**

या वर्षी स्त्री शक्तीच्या ग्रामीण कामाला मा. संचालक व मा. कार्यवाह यांचे मासिक बैठकीत मार्गदर्शन मिळाले. वेल्हे केंद्राला संचालकांच्या ३ भेटी झाल्या. स्थानिक कार्यकर्त्यांशी त्यांनी संवाद साधला, त्यामुळे प्रेरणा वाढीला नक्कीच उपयोग झाला.

# राजस्थान अभ्यास दौरा

आशा सुर्वे

करोना काळातही आरोग्य सखी प्रकल्पाचा भाग म्हणून ३२ जणींनी राजस्थानाला जायची सगळी तयारी केली. एक दिवस आधी चाचणी केली आणि दुर्दैवाने ५ जणींना करोना झाला आहे असे जाण्यापूर्वी कळले. त्यामुळे २७ जणी १६-२२ जानेवारी या दिवसात राजस्थानला जाऊन आल्या. त्यांचे अनुभव कथन ऐकले आणि जाऊ न शकलेल्या ५ जणींसोबत अजून २९ जणी निघाल्या आणि २-८ मार्च या काळात दुसरा दौरा राजस्थानाला जाऊन आला. दोन्ही दौऱ्यात मिळून २७ गावातल्या ५६ जणी जाऊन आल्या, दोन्ही दौरे साधारण सारख्याच ठिकाणांना भेटी देऊन आले.

दौऱ्याची सुरुवात पुणे ते जयपूर रेल्वे प्रवासाने केली. पहिल्यांदाच रेल्वेत बसणाऱ्या १८ जणी होत्या. पहिली भेट जयपूर! आपल्या स्पर्धा परीक्षा केंद्राचे विद्यार्थी डिएसपी परिस देशमुख सरांची भेट आणि गप्पा झाल्या. प्रबोधिनीतून मिळालेले माणूस घडणीचे शिक्षण डिएसपी म्हणून आत्ता ड्युटी बजावताना खूप उपयोगाचे वाटते असे ते म्हणाले. त्या भेटी नंतर तिलोनियाला बेअर फूट कॉलेजमध्ये मुक्कामी गेलो. कॉलेज पाहिले. सोलरचे आंतरराष्ट्रीय पातळीवर दिले जाणारे प्रशिक्षण, sanitary नॅपकिन कसे बनवतात, हातमागाच्या वस्तू कशा बनवतात, स्थानिक अशिक्षित महिला दात तपासणी कशी करतात हे सगळे पाहिले. ४ थी पास असणाऱ्या महिला इंजिनियर, डॉक्टर सारखे काम करताना पहायला मिळाले. तिथले २० वेगवेगळे विभाग पाहिले. संस्थेचे कार्यवाह मा. रामकरणजी यांनी संस्थेची माहिती दिली. सर्वांच्यावतीने वंदनाताई कामठे यांनी बेअर फूट संस्थेचे श्री. बंकर रॉय यांची भेट घेतली.

तिलोनियाहून पुढे पुष्करचे ब्रह्मदेव मंदिर पाहिले. पुष्करहुन अजमेरला जाताना वाटेत राजस्थान महिला कल्याण मंडळ संस्थेला भेट दिली. दिव्यांग मुलांसाठी काम कसे चालते ते पाहिले. मुक्कामी आम्ही उदयपूरला गेलो.

> चारही बाजूला उंच उभे भिंती पाहिल्या की अंगावर काटे आणि डोळ्यात पाणी आल्या शिवाय राहत नाही..... त्या भिंती म्हणजे ३०,००० हजार स्त्रियांच्या जोहराचे प्रतीक .....

> **माझे शिक्षण कमी झाले आहे, वय झालं आहे, मी काहीच करू शकत नाही असा माझा गैरसमज या दौऱ्यामुळे दूर झाला. मग विचार करा आपण किती strong आहोत. वेगवेगळी पर्यटन स्थळ पाहायला मिळाली. पूर्वीचा इतिहास पाहायला व ऐकायला मिळाला, नव्या मैत्रिणी मिळाल्या, नवनवे उपक्रम शिकायला मिळाले, आत्मविश्वास वाढला, कधी मनात किंवा स्वप्नात देखील वाटल नव्हत की मी विमानातून बसून प्रवास करेन आणि ते ही महिला दिन यादिवशी!**

हल्दीघाटी पाहिली. तिथले म्युझियम पाहिले. महाराणा प्रताप यांच्यावर एक फिल्म पाहिली. आजीविका संस्था स्थलांतरित लोकांसाठी काम करते, ती पाहिली. उदयपूर येथील हाथिपोल बाजार फिरलो. राजस्थानी विशेष बांधणीचे कपडे, लाखेच्या बांगड्या खरेदी करत मार्केट फिरणे झाले. मग गट चित्तोडगड बघायला गेला. आपल्या गडकोटाशी तुलना करता न येणारा प्रचंड किल्ला पाहिला. महाराजांच्या पहिल्या राजधानीच्या म्हणजे राजगड परिसरातील या सगळ्या जणी, चितोडगडच्या राणी पद्मिनी सोबत हजारो जणींनी केलेल्या जोहाराची भूमी बघताना वेगळ्याच भावविश्वात गेल्या.

परतीचा प्रवास सगळ्यात उत्कंठा असणारा विमानाचा होता. ४० जणींचा विमान प्रवासाचा पहिलाच अनुभव! बऱ्याच जणी तर असा विमानप्रवास करणाऱ्या गावातल्याही पहिल्याच! शब्दशः आभाळाला हात लावून परतल्या.

दौरा खूप अनुभव संपन्न झाला. राजस्थानचा वेगळा पोशाख, उंटगाडी, वेगळ्या बांधणीची घरं.... हे बघताना सार्वजनिक ठिकाणी महिलांची संख्या कमी आणि वावरही मोकळेपणाने नाही (जरी बांगडीचा गाळा २.४ पेक्षा जास्त असला तरी....) हे ही टिपले!

वेगळ्या संस्कृतीचे दर्शन करुन दौरा समृद्ध होऊन परतला

***

> आजच्या काळातही समाजात मानवता जिवंत आहे हे आजीविका ब्यूरो हे पाहिल्या नंतर लक्षात येते. ही संस्था गावातील लोकांची गरज ओळखून तेथील मुली - मुले, महिला यांना प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार मिळविण्याच्या संधी उपलब्ध करून देतात...आणि मुलींसाठी छान काम करतात. ही लोकं कामासाठी इतर राज्यात जातात..तेथे त्यांची ओळख पटविण्यासाठी या संस्थेने लोकांसाठी कार्ड तयार केले ती संकल्पना मला खूप आवडली.

**हे सर्व शक्य झाले ते करोना सारख्या अडचणीच्या काळात सुद्धा देणगी दिलेल्या देणगीदारांमुळच! बदलाची प्रक्रिया प्रभावीपणे व्हावी म्हणून वेग वाढविण्यासाठी हातभार लावलेल्या व्यावसायिक सामाजिक जबाबदारीच्या (उडठ) भागीदारीमुळेच! त्या सर्वांचे मनापासून आभार.**

## ♦ देणगीदार ♦

| | | | |
|---|---|---|---|
| प्रकाश खेडकर | ११,०००/- | गायत्री सेवक | ४०,०००/- |
| आशिष कुंभोजकर | ११,०००/- | मंदार गोडबोले | ४४,०००/- |
| माधवी गोखले | १५,०००/- | हेमलता काळे | ५०,०००/- |
| स्मिता खरे | १५,०००/- | सलील नित्सुरे | ५०,०००/- |
| उमेश पुरोहित | १५,०००/- | बायो वेद फार्मा | ६३,१००/- |
| डॉ. स्नेहलता सहस्रबुद्धे | २१,०००/- | सुहासिनी बिवलकर | ७५,०००/- |
| डी. व्ही.ब्रह्मे सन्स अँड सर्व्हिसेस | २५,०००/- | कुंदा जोगळेकर | १,००,०००/- |
| जिव्हाळा फौंडेशन | २५,०००/- | सुधीर पतके | १,००,०००/- |
| राजीव रानडे | २५,०००/- | रोटरी क्लब ऑफ पुणे प्राईड | २,००,०००/- |
| अमेय लाटकर | २५,०००/- | बाटलीवाला अँड कराणी सिक्युरिटीज | २,८०,०००/- |
| आसावरी पाध्ये | २५,०००/- | जानकी देवी बजाज ग्राम विकास संस्था | ४,७०,०००/- |
| अनघा बागुल | २५,०००/- | मिबा कंपनी | ५,००,०००/- |
| जयश्री डांगे | २५,०००/- | एन.जी. परांजपे प्रतिष्ठान | ५,६२,५००/- |
| कार्कीनोज हेल्थ केअर प्रा. लि. | २७,०००/- | सायबेज आशा ट्रस्ट | ६,२९,७००/- |
| अजित शंकर बापट | ३०,०००/- | अडोर डायट्रॉन प्रा. लि, | ७,३०,०००/- |
| सुनील गोखले | ३५,०००/- | ग्लोबंट इंडिया प्रा. लि. | ९,१४,०००/- |
| इनरव्हील कलब ऑफ पुणे |  | बजाज फिनझर्व लि. | ११,००,०००/- |
| मिड टाऊन | ३५,०००/- | कोफोर्ज सोल्युशन | १०,००,०००/- |

**प्रत्येकी १०,०००/-**

अपूर्वा कुलकर्णी, नंदा महाजन, मीना अशीजव, प्रभावती इनामदार,
बेळांबे फौंडेशन, अलका पटवर्धन, सुहास कडलसकर

अनिरुद्ध करमरकर ७,५००/- , गायत्री सरदेशपांडे ७,०००/-, हर्षदा मिलिंद पटवर्धन ६,०००/-,

**प्रत्येकी ५,०००/-**

रश्मी गोखले, सागर रमाकांत चुरी, जयश्री पाठक, हर्षदा पटवर्धन, अनघा जोशी

**रु. ५०० ते २,५००/- पर्यंत**

गौरी देवरे, विद्या जोशी, संध्या पालखे, संजना गोलटकर

**ज्ञान प्रबोधिनीला दिलेल्या देणग्या आयकर कायद्याच्या परि. ८० (जी) खाली करमुक्त आहेत.**

**'ज्ञान प्रबोधिनी' या नावाने धनादेश काढावा**

संपर्क : **ज्ञान प्रबोधिनी** : **स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण),**

५१० सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० दूरभाष : (०२०) २४२०७१६२/१३३

★ **शिवापूर** : खेड-शिवापूर वाडा, ता. हवेली, जिल्हा पुणे ४१२ २०५

★ **आंबवणे** : मातृछाया, ता. वेल्हे, जिल्हा पुणे ★ **वेल्हे** : पोलिस स्टेशन जवळ, ता. वेल्हे, जिल्हा पुणे